पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १६५ ■ सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




# ‘महाराष्ट्र विकासाच्या पाठीशी ठामपणे उभा’

## भाजप आणि महायुतीच्या यशानंतर पीएम मोदींनी मराठीतून मानले आभार

वृत्तसंस्था २२ डिसेंबर

**नवीदिल्ली:** महाराष्ट्रातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींचा निकाल जाहीर झाला आहे. महाराष्ट्रात विविध कारणांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही वर्षांपासून प्रलंबित होत्या. अखेर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २०१७ नंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी झाली. या स?थानिक निवडणूकीतही महायुतीने विरोधकांचा धुव्वा उडवत दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी ट्वीट करत महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे रिट्वीट करत मराठीतून शुभेच्छा दिल्या आहेत. ‘महाराष्ट्र विकासाच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत भाजपा आणि महायुतीवर विश्वास दाखवल्याबद्दल मी महाराष्ट्रातील जनतेचा ऋणी आहे. आमच्या लोक-केंद्रित विकासाच्या दृष्टीकोनावर जनतेने दाखवलेल्या विश्वासाचे हे




प्रतिबिंब आहे. आम्ही राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी नव्या ऊर्जेने काम करण्यासाठी वचनबद्ध आहोत. ?भाजपा आणि महायुतीच्या तळागाळापर्यंत मेहनत घेतलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे मी कौतुक करतो,’ असे मोदींनी आपल्या ट्वीटमध्ये म्हणत आभार मानले आहेत.

तर दुसरीकडे अमित शाह यांनी म्हंटले की, ‘महाराष्ट्र नगर पंचायत आणि नगर परिषद निवडणुकीत महायुतीला प्रचंड समर्थन दिल्याबद्दल राज्यातील जनतेचे आभार. हा विजय पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारांच्या जनकल्याणकारी योजनांवर जनतेने दिलेला आशीर्वाद आहे.’ यावेळी अमित शाह त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे विशेष अभिनंदन केले आहे.


दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, राज्यात भाजपचे ३,३०० पेक्षा जास्त नगरसेवक, तर १३४ नगराध्यक्ष थेट निवडून आले आहे. एकूण निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी तब्बल ४८ टक्के नगरसेवक एकट्या भाजपचे आहे. . नगरसेवकपदावर भाजपने नवा रेकॉर्ड केला. यापूर्वीच्या २०१७ च्या निवडणुकीत भाजपचे १६०२ नगरसेवक होते, आता त्याच्या दुपटीचे ३३०२ नगरसेवक आहेत. या निकालाने भाजप हा महाराष्ट्रातील नंबर १ पक्ष असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले असल्याचे सांगितले. तसेच जया ठिकाणी आम्हाला यश मिळाले नाही, तिथेही आम्ही पूर्ण ताकदीने विकासकामे करू, असे आश्वासन देखील फडणविसांनी दिले.

### भाजपाने जागांची संख्या केली दुप्पट

महाराष्ट्र राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालांनी महायुतीला अभूतपूर्व कौल दिला आहे. या निवडणुकीत भाजपाने १२९ नगरपालिकांवर (४५ टक्के) विजय मिळवून २०१७ च्या ९४ जागांच्या तुलनेत मोठी झेप घेतली आहे. एकूण २८८ नगरपालिकांपैकी महायुतीने २१५ (७४.६५ टक्के) ठिकाणी विजय मिळवून निर्भेळ यश संपादन केले आहे. या निवडणुकीत भाजपाच्या नगरसेवकांची संख्या गेल्या वेळेच्या तुलनेत दुपटीहून अधिक झाली आहे. २०१७ मध्ये भाजपाचे १,६०२ नगरसेवक होते, जे आता वाढून ३,३२५ (४७.८२ टक्के) झाले आहेत. महायुतीचा विचार करता, एकूण ६,९५२ जागांपैकी ४,३३१ जागांवर (६२.३०टक्के) महायुतीचे उमेदवार निवडून आले आहेत. जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीवर आणि राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या मार्गदर्शनावर पुन्हा एकदा विश्वास दर्शविला आहे. महाराष्ट्र भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या कार्यकाळातील ही पहिलीच निवडणूक असून, त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने ही चमकदार कामगिरी केली आहे. हा विजय समर्पित कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमामुळेच शक्य झाला असल्याचे गौरवोद्गार काढण्यात आले आहेत. महायुतीच्या नेत्यांनी या विजयाला आगामी महानगरपालिका निवडणुकीची नांदी म्हटले आहे. ‘हा विजय म्हणजे येणाऱ्या मोठ्या विजयाचा केवळ एक ट्रेलर आहे,’ असे सांगत आगामी काळात अधिक जोमाने कामाला लागण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.

# काँग्रेस शिष्टमंडळ आंबेडकरांच्या भेटीला !

## वंचितची नगर परिषदेत चमकदार कामगिरी अधोरेखित



प्रतिनिधी २२ डिसेंबर

**मुंबई :** नवी दिल्ली येथून बाळासाहेब आंबेडकर यांना आलेल्या एका महत्त्वपूर्ण फोननंतर राज्याच्या राजकारणात वेगवान घडामोडी घडू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आज काँग्रेस पक्षाकडून एआयसीसीचे सेक्रेटरी श्री. वेंकटेश आणि त्यांच्यासोबत मुंबई काँग्रेस मधील काही महत्त्वपूर्ण पदाधिकारी दादर येथील राजगृहावर बाळासाहेब आंबेडकरांची भेट घेण्यासाठी आले होते. राज्यातील नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. त्यात वंचित बहुजन आघाडीचे १०४ पेक्षा अधिक नगरसेवक आणि ५ नगराध्यक्ष भरघोस मतांनी निवडून आले आहेत. त्यानंतर राज्यात वंचितला टाळणे कुठल्याही आघाडीला अशक्य असल्याचे चित्र आहे.

या बैठकीस वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, युवा नेते सुजात आंबेडकर तसेच पक्षासाठी धोरणात्मक काम करणारे सुमित आनंद उपस्थित होते. बैठकीदरम्यान ॲड. आंबेडकर आणि श्री. वेंकटेश हे आतल्या खोलीत सुमारे अर्धा तास चर्चा करत होते. या चर्चेनंतर काँग्रेसकडून वंचित बहुजन आघाडीस काही प्रस्ताव देण्यात आले असल्याची माहिती राज्य उपाध्यक्ष डॉ. धैर्यवर्धन पुंडकर यांनी दिली. मात्र, हे प्रस्ताव आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आहेत की राष्ट्रीय पातळीवरील राजकीय समीकरणांशी संबंधित आहेत, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. या संदर्भात ॲड. आंबेडकर यांच्याशी अद्याप सविस्तर चर्चा झालेली नसून, याबाबतची भूमिका ते योग्य वेळी स्पष्ट करतील, असेही डॉ. पुंडकर यांनी सांगितले.

दरम्यान, या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना डॉ. धैर्यवर्धन पुंडकर म्हणाले की, काँग्रेस पक्षाला आता हे उमगू लागले आहे की, भाजपच्या विरोधात एकट्याने लढा देणे शक्य नाही. भाजप आणि आरएसएसला पराभूत करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीशिवाय महाराष्ट्रात कोणतेही राजकारण शक्य नाही. वंचित बहुजन आघाडी हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा अपरिहार्य भाग असून, तिच्याशिवाय कोणताही गैर-भाजप पक्ष राज्यात टिकू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### काँग्रेस नेत्यांची आडकाठी

भाजपला दूर ठेवण्याच्या उद्देशाने वंचित आणि काँग्रेसची आघाडी होण्याच्या बातम्या काँग्रेस तर्फे पेरल्या जात आहे. पण, वंचित आणि काँग्रेसच्या आघाडीत स्थानिक पातळीवरील नेते आडकाठी आणत असल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. अकोल्यात स्थानिक नेत्याना वंचित आणि काँग्रेस मध्ये आघाडी नको. आता हा स्थानिक काँग्रेस नेता कोण असा प्रश्न विचारला जात आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय स्तरावरील नेते मुंबईत प्रकाश आंबेडकर यांच्या दादर स्थित निवासस्थानी चकरा मारत असताना अकोल्यातील स्थानिक नेत्याला वंचित सोबत आघाडी का नको की यामागे अजून काही दूसरेच कारण या नेत्यांमध्ये आहे असा प्रश्न विचारला जात आहे.

# नगरपरिषदेचे अपयश भरून काढा ! मंत्री संजय राठोड यांचे निर्देश

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे गट पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोला :** अकोला महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाच्या शिवसेनेच्या हालचालींना वेग आला आहे. तर शिंदे शिवसेनेचे नेते तसेच मंत्री संजय राठोड यांनी अकोल्यात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीत पदाधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

नगरपरिषद निवडणुकीत आलेले अपयश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भरून काढायचे आहे, असा स्पष्ट संदेश संजय राठोड यांनी दिला. विशेष म्हणजे नगरपरिषद निवडणुकीचा निकाल जाहीर होताच संजय राठोड रात्रीच अकोल्यात दाखल झाले आणि पदाधिकाऱ्यांसोबत तातडीची बैठक घेतली. दरम्यान, अकोल्यातील शिंदे गटाच्या शिवसेनेत सध्या दोन गट दिसून येत आहेत. त्यात एक गट माजी आमदार तथा संपर्कप्रमुख गोपीकिशन बाजोरिया यांच्या नेतृत्वाखाली आहे, तर दुसरा गट जिल्हा प्रमुख श्रीरंग पिंजरकर यांचा आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका निवडणुकीत शिंदे गटाची रणनीती काय असणार, तसेच अंतर्गत गटबाजीवर तोडगा काढला जाणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



### शिवसेनेच्या २ गटामध्ये राडा

राज्यात काल नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांचे निकाल लागले. सर्वाधिक निकाल महायुतीच्या बाजूने पाहायला मिळाला. अकोल्यात मंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील दोन गटात वाद झाला. माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया आणि जिल्हाप्रमुख अश्विन नवले यांचे समर्थक एकमेकांवर धावून गेले. हा वाद महापालिकेच्या जागा वाटपावरून झाला असल्याचे म्हटले जात आहे. काल रात्री मंत्री संजय राठोड अकोल्यातल्या आरजे हॉटेलला मुक्कामी होते. याच ठिकाणी मंत्री राठोड यांच्या उपस्थित हा संपूर्ण वाद झाला. शिंदे सेनेतीलच काही पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अकोला जिल्ह्यात सहा नगरपालिका निवडणुकीत शिंदे गटाला मोठ अपयश आलं आहे. केवळ ८ नगरसेवक शिंदे गटाचे निवडून आले. ही नगरपालिका निवडणूक माजी आमदार गोपिकिशन बाजोरिया यांच्या नेतृत्वात लढविण्यात आली होती. त्यामुळे आता अकोला महापालिका निवडणूक बाजोरिया यांच्या हाती न द्यावी, असा प्रस्ताव मंत्री राठोड यांच्यासमोर नवले गटाने ठेवला. याच दरम्यान जिल्हाप्रमुख अश्विन नवले आणि शिंदे गटाचे नेते बाजोरिया यांचे समर्थक एकमेकांवर धावून गेले.

सिटी न्यूज सुपरफास्ट
ईपेपर वाचा
http://epaper.citynewssuperfast.com
रोज दु. ४ वाजता









सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख क्रीडा महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ

प्रतिनिधी २२ डिसेंबर



**अमरावती:** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाध्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सव निमित्त श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, येथे श्री शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख क्रीडा महोत्सव स्पर्धेचे आयोजन गुरुवार दिनांक १८ डिसेंबर व शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर रोजी शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे करण्यात आले होते. या महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये पार पडला.

सदर स्पर्धेचे समारोपीय समारंभाच्या वेळी मा. श्री. हर्षवर्धनजी देशमुख अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, मा. श्री. दिलीपबाबु भं. इंगोले कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, कार्यक्रमाचे समारंभाध्यक्ष ॲड. गजाननराव के. पुंडकर उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती प्रमुख अतिथी. ॲड. जयवंत उपाय भैय्यासाहेब वि. पाटील (पुसदेकर) उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती प्रा. सुभाष श्री. बनसोड कार्यकारणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती मा. प्रा. भैय्यासाहेब मेटकर व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ तुषार शेळके (१९ व्या आशियाई खेळात रजत पदक विजेता) मा. एच डी भोगे आंतरराष्ट्रीय तिरंदाज खेळाडू श्री मा. सुभाष पावडे श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य बबनराव चौधरी त्याचप्रमाणे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे शालेय विभागाचे उपव्यवस्थापक . पंडित एस पंडागळे, तसेच स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्वप्रथम डॉ. पंजाबराव उपाध्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला हारर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात यावेळी पाहुण्यांचे स्वागत फुलझाड देऊन करण्यात आले त्यानंतर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. हर्षवर्धनजी देशमुख यांनी याप्रसंगी सर्वप्रथम सर्व विजेत्या चंमुचे अभिनंदन केले त्याचप्रमाणे श्री. दिलीपबाबु भं. इंगोले कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, यांनी याप्रसंगी खेळाडूंनी खेळाच्या मैदानात सर्वोत्तम कामगिरी केल्याबद्दल खेळाडूंना पुढील वाटचालीच्या शुभेच्छा व आशीर्वाद याप्रसंगी दिला त्यानंतर कार्यक्रमाचे समारंभाध्यक्ष ॲड. गजाननराव . पुंडकर यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना क्रीडा स्पर्धेमध्ये ग्रामीण क्षेत्रातील मुलांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यातील कलागुणांना वाव दिला पाहिजे असे प्रतिपादन करून खेळाडूंना पुढील आयुष्याच्या वाटचाली करता शुभेच्छा दिल्या त्यानंतर मा. प्रा. सुभाष श्री. बनसोड कार्यकारणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना खेळाडू हा खेळ वृत्तीने खेळला पाहिजे त्यामुळेच खेळामध्ये खेळाडू वृत्ती निर्माण होते ही वृत्ती समाजामध्ये वावरणासाठी त्याला बळ देते . तुषार शेळके (१९ व्या आशियाई खेळात रजत पदक विजेता) मा. एच डी भोगे आंतरराष्ट्रीय तिरंदाज खेळाडू यांनी याप्रसंगी खेळाडूंना मार्गदर्शन करताना शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये श्री शिवाजी शारीरिक शिक्षण संस्था मध्ये शिकत असताना आपले विद्यार्थी दशक ची पार्श्वभूमी या ठिकाणी स्पष्ट केली व श्री शिवाजी शिक्षण संस्थेने आम्हा दोघांना अगणित मदत केली त्यामुळे आम्ही आशिया स्पर्धेपर्यंत आज पोचू शकलो याचा आम्हाला आयुष्यात कधीच विसर पडणार नाही असे आपले व्यक्तिगत मत या ठिकाणी त्यांनी स्पष्ट केले त्यानंतर प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे यांनी आपले प्रास्ताविक भाषण केले त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात महाविद्यालयातील क्रिडा खेळाडू व स्पर्धे संबंधित ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली तसेच स्पर्धा घेण्यामागचा उद्देश विशद केला यानंतर लगेचच शिवाजी शिक्षण संस्थे अंतर्गत येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून सहभागी झालेल्या १७ व १९ वयोगटातील मुले व मुली च्या झालेल्या कबड्डी हॉलीबॉल, व खोखो या खेळाच्या स्पर्धेमधून विजेत्या व उपविजेत्या टीमचा बक्षीस वितरण समारंभ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पार पडला सदर स्पर्धेमध्ये नागपूर विभागाने सर्वात जास्त स्पर्धेमध्ये अव्वल दर्जा प्राप्त करून जनरल चॅम्पियनशिपचा मान मिळवला सदर कार्यक्रमाचे संचालन महाविद्यालयाचे प्रा. जितेंद्र राऊत यांनी केले व आभार प्रदर्शन श्री शिवाजी मराठा हायस्कूल चे मुख्याध्यापक प्रा. संदीप इंगोले यांनी केले सदर डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख क्रीडा महोत्सव स्पर्धेच्या समारोपीय व बक्षीस समारंभाच्या प्रसंगी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व खेळाडू विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते सदर दिवसीय श्री शिवाजी क्रीडा महोत्सव स्पर्धा चे आयोजन यशस्वीरित्या संपन्न करण्याकरता सदर स्पर्धा आयोजना करता श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव मा. प्राचार्य वी.गो ठाकरे श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्पर्धेच्या आयोजन समितीचे सचिव डॉ. सुभाष गावंडे श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे शालेय विभागाचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारीनी या स्पर्धेच्या यशस्वी आयोजना यांनी अथक परिश्रम घेतले.

# अंजनगावात भाजपचे अविनाश गायगोले यांचा ऐतिहासिक विजय

प्रतिनिधी २२ डिसेंबर

नगराक्षपदासाठी शेवटपर्यंत अटीतटीच्या लढतीत भाजपाचा निसटता विजय. आमदार पुत्र पराभूत. कांग्रेसची कडवी झुंज



**अंजनगाव सुर्जी :** अंजनगाव नगरपालिकेत भाजपाचे उमेदवार अविनाश गायगोले यांनी नगराध्यक्ष म्हणून ऐतिहासिक विजय प्राप्त केला आहे. सकाळी दहा वाजल्यापासून सुरू झालेल्या मतगणणेत शेवटपर्यंत भाजप व कांग्रेसची अटीतटीची लढत दिसून आली. नगरसेवकांचे निकाल संमीश्र लागले तरीही आकर्षण व उत्कंठेने भरलेल्या मतगणणेत शेवटपर्यंत कार्यकर्ते श्वास रोखून होते. भाजपाच्ची तीहर्या फेरी अखेरची आघाडी चवथ्या फेरीनंतर कमी कमी होत गेली व पाचव्या फेरीत आठशेच्या आत आल्याने सर्वांचे श्वास रोखले गेले. पहील्याच फेरीत शींदेसेनेच्या उमेदवाराने आकस्मीक मुसंडी मारून दुसर्यास्थानी प्रवेश केला व उबाठाचे आमदार पुत्राला मागे टाकले. भाजपा २२२५, शिंदे सेना १५२९ व कांग्रेस ९८१अशी पहिल्या फेरीची स्थीती होती. दुसर्या फेरीत भाजप ३७०४ व कांग्रेस २५७१ अशी स्थिती होती. फरक११३३ मतांचा होता. तीसर्या फेरीत हा फरक कमी होऊन८८५ मतांचाच राहीला. चवथ्या फेरीत थोडा वाढून १४३४मतांचा झाला, पाचव्या फेरीत तर४११ मतांचा व सहाव्या फेरीअखेर केवळ १२४ मतांचा राहीला. अखेरपर्यंत कांग्रेस ने भाजपाच्या उमेदवारांची दमछाक केली पण शेवटचे फेरीत भाजपाने निर्णायक बहुमत नोंदवीले आणी नीवडणूक अधिकार्यांनी भाजप उमेदवार विजयी झाल्याचे जाहीर केले. सुर्जी नगरपरिषद निवडणुकीमध्ये प्रभाग निहाय विजयी उमेदवारांनूसार प्रभाग क्र १अ/पुनम सुरज येऊल (५४१) शिवसेना शिंदे ह्यानी आणी प्रभाग ब मधे भाजपचेउमेश तुळशीराम भोंडे (४२६) ह्यांनी प्रभाग २अमधे उबाठा शीवसेनेचे सुयोग उत्तमराव खाडे (९३०) ह्यांनी व २ ब मधे रूपाली सुधीर देवगिरे (६२४) ह्यांनी प्रभाग ३अ मधे भाजपाचे उमा राजेश ओळंबे (१०५२) ह्यांनी व प्रभाग ३ब मधे प्रविण देविदास नेमाडे (११२८) ह्यांनी प्रभाग ४अ मधे शीवसेना शींदे गटाच्या प्रियंका निलेश आवंडकर (१०५४) ह्यांनी व प्रभाग ४ ब मधे कांग्रेसचे मो. आंशिक मो. शरिफ (११५४) ह्यांनी, प्रभाग ५ अ मधे शीवसेना शींदेचे रामण्य रविंद्र आवंडकर (६७१) ह्यांनी व प्रभाग ५ब मधे कांग्रेथस च्या, शाहीन परवीन मुजम्मील अली (६७२) ह्यांनी, प्रभाग ६अमधे कांग्रेस च्या नसीमा बी रहीम शाह (८२१) ह्यांनी व प्रभाग ६ब मधे कांग्रेस चे शोहेब खान यूसूफ खान. (७२०) ह्यांनी, प्रभाग ७अमधे उबाठा शीवसेनेच्यासीमा गजानन विजेकर (८६५) ह्यांनी व ७बमधे उबाठा शीवसेनेचे मो. रेहान अब्दुल मुनाफ (६५४) ह्यांनी, प्रभाग ८अमधे उबाठा शीवसेनेच्या सुनिता भास्कर बाळे. व प्रभाग८ब. मधे शीवसेना उबाठाचे श्रीकांत मनोहर जुनगरे (९६८) ह्यांनी, प्रभाग ९अमधे भाजपाच्या उज्वला विलास कविटकर (९६०) ह्यांनी व प्रभाग९बमधे भाजपाचे मनिष काशिनाथ मेन (८८८) ह्यांनी. प्रभाग १० अ.मधे अपक्ष आयशा आशिक मा.शारफ (१९५४) ह्याना, प्रभाग ५ अमघ शीवसेना शींदेचे रामण्य रविंद्र आवंडकर (६७१) ह्यांनी व प्रभाग ५ब मधे कांग्रेथस च्या, शाहीन परवीन मुजम्मील अली (६७२) ह्यांनी, प्रभाग ६अमधे कांग्रेस च्या नसीमा बी रहीम शाह (८२१) ह्यांनी व प्रभाग ६ब मधे कांग्रेस चे शोहेब खान यूसूफ खान. (७२०) ह्यांनी, प्रभाग ७अमधे उबाठा शीवसेनेच्यासीमा गजानन विजेकर (८६५) ह्यांनी व ७बमधे उबाठा शीवसेनेचे मो. रेहान अब्दुल मुनाफ (६५४) ह्यांनी, प्रभाग ८अमधे उबाठा शीवसेनेच्या सुनिता भास्कर बाळे. व प्रभाग८ब. मधे शीवसेना उबाठाचे श्रीकांत मनोहर जुनगरे (९६८) ह्यांनी, प्रभाग ९अमधे भाजपाच्या उज्वला विलास कविटकर (९६०) ह्यांनी व प्रभाग९बमधे भाजपाचे मनिष काशिनाथ मेन (८८८) ह्यांनी, प्रभाग १० अ. मधे अपक्ष आयशा परविन अकबर शाहा (६५१) व प्रभाग १० ब. मधे कांग्रेस च्या नाजिया बानो मो. इरफान (५२१) ह्यांनी, प्रभाग ११अमधे कांग्रेसचेमो. आसिफ मो. ताज (११८१) व प्रभाग११ ब. मधे आफरिन कैसर अ. नईम (१३३९) ह्यांनी, प्रभाग १२अमधे कांग्रेस च्या योगिता प्रदीप देशमुख (८८७) ह्यांनी व प्रभाग १२ब. मधे कांग्रेस चे, मो. नाजिम मो. अय्युब (८४३९ ह्यांनी,, प्रभाग १३अमधे शहरात प्रथमच समाजवादी पक्षाचे खाते उघडले असुन, आबेदा बी. मो. आरिफ (९११) व प्रभाग १३ ब. मधे इब्राहिम बेग हसन बेग (८४२) ह्या दोन उमेदवारांनी विजय नोंदवीला. प्रभाग १४अ मधे उबाठा शीवसेनेचे अविनाशज्ञानेश्वर ढेंगे (८४९) व प्रभाग१४ब मधे भाजपाच्या प्रियंका शंकर मालठाणे (१२२१). ह्यांनी विजय नोंदविला.

# 17 जागांवर मारली बाजी

भाजपला चार तर राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी एक-एक जागा तर शिवसेना शिंदे गटाला दोन जागा मिळाल्या

प्रतिनिधी २२ डिसेंबर



**दर्यापूर :** दर्यापूर नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत मतदारांनी दिलेला कौल हा शहराच्या राजकारणाची दिशा बदलणारा ठरला आहे. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने मोठे यश संपादन करत केंद्रस्थानी स्थान मिळवले असून, भारतीय जनता पक्षासाठी हा निकाल संमिश्र स्वरूपाचा मानला जात आहे.

काँग्रेसचा इतिहास विजय झाला असून त्यांना १७ जागा मिळाल्या तर भाजपाला चार जागांवर समाधान मानावे लागले. भाजप सोबत असलेल्या महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला एक जागा मिळाली. तर शरद पवार गटाला सुद्धा एक जागा मिळाली. नगराध्यक्ष म्हणून मंदाकिनी भारसाकळे यांचा विजय झाला. माजी नगराध्यक्ष नलिनी भारसाकळे यांना पराभवाचा सामना करावा लागला. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत एकूण २५,१०९ मतदारांनी आपला हक्क बजावला. निकालानुसार काँग्रेस समर्थित उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर मतदारांचा पाठिंबा मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्षपदाची उमेदवार प्रदीप मलीये हे नगराध्यक्ष म्हणून तरी पराभूत झाले असले तरी नगरसेवक म्हणून निवडून आले आहे. शिवसेना शिंदे गटाला दोन जागा मिळाले आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाला एकही जागा मिळवता आली नाही. शिवसेनेचा आमदार असूनही दर्यापूर कडे दुर्लक्ष केल्याच्या भावना शिवसैनिकांमध्ये होत्या. मंदाकिनी भारसाकळे यांनी नगराध्यक्ष पदाचे प्रमाणपत्र निवडणूक निर्णय अधिकारी कडून स्वीकारताना खासदार बळवंत वानखडे, सुधाकर भारसाकळे, कांचनमाला गावंडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे मधमाशी पालन प्रशिक्षणाचे आयोजन

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अमरावती :** नवीन शैक्षणिक धोरणनुसार विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता व कौशल्य विकास वाढीस लागण्याच्या दृष्टीने पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय येथे दिनांक २२ ते २७ डिसेंबर या कालावधीमध्ये

मधमाशी पालन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार आहे. पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती तर्फे सदर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले असून सदर प्रशिक्षणासाठी १०० पेक्षा अधिक विद्यार्थी व शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली आहे. केंद्रीय मधमाशी प्रशिक्षण व संशोधन संस्थेचे तज्ञ प्रशिक्षक प्रा. हेमंतकुमार डुंबरे प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करणार असून सदर प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देखील दिले जाणार आहे. सदर प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना मधमाशी पालनाचे तांत्रिक ज्ञान प्रात्यक्षिकासह मिळणार असून या क्षेत्रात उद्योजक बनू पाहणाऱ्या युवकांना हे प्रशिक्षण सुवर्णसंधी असल्याचे मत कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे व उपप्राचार्य नितेश चौधरी यांनी व्यक्त करून विद्यार्थ्यांनी सदर प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

# डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात उमेद-पंख-विश्वासाचे उपक्रमांतर्गत जयपुर फूट वितरण शुभारंभ

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अमरावती :** श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विशेष पुढाकारातून शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त 'उमेद-पंख-विश्वासाचे' या सामाजिक उद्देशाने दिव्यांग बांधवांसाठी मोफत जयपुर फुट वितरणाचा उपक्रम दिनांक १८ ते २७ डिसेंबर या कालावधीत डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती, इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोला, जयपुर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मणियार (पुणे) आणि दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.



डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथे जयपूर फूट वितरणाची सुरुवात रविवार, दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आली या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सौ.रजनीताई देशमुख तसेच डॉ.अनुप्रिता देशमुख, विद्यानंद देशमुख, आबासाहेब देशमुख, कल्पेश देशमुख, प्रकल्प चे ब्रँड ॲम्बेसेडर शेख अब्दुल शेख अबरार, अबोली कडू अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, आर्किटेक्ट रामेश्वर मणियार, आर्टिस्ट रजनी अंबादे, सौ.श्रद्धा वासनिक, आकाश अंबादे, संदीप पुंडकर समन्वयक उमेदपंख विश्वासाचे निःशुल्क जयपूर फूट वितरण, डॉ.विनीत कौर, प्रकाश गवळी प्रभजीत सिंह बछेर ,मानद सचिव इंडियन रेड क्रॉस सोसाइटी अकोला उपस्थित होते. यावेळी डॉ.अनुप्रिता देशमुख यांनी आपल्या भाषणातून सांगितले की डॉ. पंजाबराव देशमुख यांची दुरदृष्टी विलक्षण होती. विदर्भातील जनतेला शैक्षणिक व आर्थिक दिव्यांगताचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी ओळखले होते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी भाऊसाहेबांनी शिक्षणरूपी गंगेचे विदर्भात आगमन घडवून आणले. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी शैक्षणिक आणि आर्थिक अपंगत्व एकाच वेळी दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या दूरदर्शी व कृतिशील कार्यामुळे विदर्भातील जनतेमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि प्रगतीची उमेद जागृत झाली. यावेळी दिव्यांग आणि गतिमानतेत अडचण असलेल्या लोकांना मान्यवरांच्या हस्ते मोफत कृत्रिम पायाचे व हाताचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात ८०० हून अधिक दिव्यांग व्यक्तींनी नोंदणी केली आहे. जयपुर फूट वितरण कार्यक्रमामुळे दिव्यांग लोकांना स्वावलंबन बनण्यास मदत होईल व रोजच्या जीवनातील हालचाली अधिक सुलभ होतील व लोकांच्या आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल.

# राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धा संपन्न

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अमरावती :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित 'राज्यस्तरीय शालेय आर्चरी (धनुर्विद्या) क्रीडा स्पर्धा २०२५-२६' उत्साहात पार पडली. जिल्हा क्रीडा संकुलातील आंतरराष्ट्रीय आर्चरी रेंजवर १७ ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत या स्पर्धा पार पडल्या.

स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी रिकर्व्ह राऊंडमध्ये खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावले. यातून निवडण्यात आलेला महाराष्ट्राचा चमू आता आगामी ६९व्या राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करेल. राष्ट्रीय स्तरासाठी निवडलेला संघ (रिकर्व्ह राऊंड): १७ वर्षांखालील मुलेमध्ये आदित्य पवार (पुणे विभाग) - ६८६ गुण, ज्ञानेश चेरले (लातूर विभाग) - ६७७ गुण, आर्यन राठोड (क्रीडा

## ♦ राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर



प्रबोधिनी) - ६७२ गुण, सिद्धार्थ तिकोणे (पुणे विभाग) - ६६२ गुण. १७ वर्षांखालील मुलीमध्ये कुमकुम मोहोड (अमरावती विभाग) - ६५७ गुण, मधुरा राठोड (अमरावती विभाग) - ६३९ गुण, प्रगती शिंदे (पुणे विभाग) - ६३६ गुण, संचिता बाबर (कोल्हापूर विभाग) - ६३४ गुण. १९ वर्षांखालील मुलेमध्ये कृष्णा शिंदे (पुणे विभाग) - ६५५ गुण, साईराज हनमे (पुणे विभाग) - ६५४ गुण, अभिराज मानमोडे (अमरावती विभाग) - ६५० गुण, अभ्युदय पखाले (क्रीडा प्रबोधिनी) - ६४९ गुण. १९ वर्षांखालील मुलीमध्ये वैष्णवी पवार (पुणे विभाग) - ६५५ गुण, तनुश्री श्रीनाथ (अमरावती विभाग) - ६१० गुण, गार्गी चव्हाण (पुणे विभाग) - ५८२ गुण, समीक्षा देशमुख (पुणे विभाग) - ५७९ गुण. सायंकाळच्या सत्रात मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पदके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

या प्रसंगी आंतरराष्ट्रीय खेळाडू कुमकुम मोहोड हिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच स्पर्धेचे तांत्रिक कामकाज पाहणाऱ्या ३० पंचांचाही गौरव करण्यात आला. उपजिल्हाधिकारी श्रद्धा उदावंत, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटूरवार, वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी स्वाती बाळापुरे, राज्य क्रीडा मार्गदर्शक अमर जाधव, निवड समिती सदस्य शुभांगी रोकडे, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदूरकर, प्रशिक्षक प्रविण शर्मा, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, क्रीडा अधिकारी अनिल इंगळे आदी या सोहळ्याला उपस्थित होते. निवड झालेला १७ वर्षांखालील संघ ६ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान झारखंड येथे, तर १९ वर्षांखालील संघ १४ ते १८ जानेवारी २०२६ दरम्यान मणिपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होईल.

# धारणीच्या नगराध्यक्ष पदी सुनील श्यामलाल चौथमल विराजमान

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**धारणी:** धारणी नगर पंचायतीच्या नगराध्यक्षपदासाठी झालेल्या अटीतटीच्या लढतीत अखेर भाजपचे सुनिल शामलाल चौथमल यांनी कॉंग्रेसचे उमेदवार राजकिशोर मालविय यांचा ४४५ मतांनी पराभव करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विषेश लक्ष असलेल्या आदिवासी भागातील नगर पंचायत निवडणूकिवर विषेश लक्ष केंद्रित केले होते. प्रहारकडे असलेल्या या नगर पंचायतीच्या निवडणूक अतिशय चुरशीची लढत झाली. सुरवातीला भाजपचे चौथमल यांनी सुरवातीपासूनच लिड घेतली ती शेवटपर्यंत कायम होती. खाली १७ नगरसेवकांमध्ये कॉंग्रेसचे ८ भाजपचे ४ तर तिन अपक्ष ,एक शिंदे सेना तर एक राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आले. या मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतः हुन पहिली प्रचार सभा धारणीत घेऊन त्यांनी प्रचाराचा श्रिगणेशा धारणीतुन केला होता. तेव्हापासून जिल्हातील राजकिय पंडितांच्या नजरा धारणी नगर पंचायतीच्या निवडणूकीच्या निकालाकडे खिलल्या होत्या. मेलघाटचे आमदार केवलराम



काळे, जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर हे गेल्या पाच दिवसांपासून धारणीत तळ ठोकून होते. एका एका वार्डावर त्यांची बारिक नजर लागली होती. अखेरच्या टप्प्यात चौथमल यांच्या गळ्यात भाजपच्या उमेदवारीची माळ पडली. त्यामुळे भाजप आणि कॉंग्रेसच्या उमेदवारांमध्ये थेट लढत होणार असल्याचा राजकिय विश्लेषकांचा अंदाज होता. प्रहारचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रफिक मेमन यांना आपली जमानत सुध्दा वाचवता आली नाही. येथिल नविन प्रशासकीय इमारतीत आज मतमोजणी झाली. यावेळी धारणीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांनी या ठिकाणी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडली नाही. मतमोजणी शांततेत पार पडली.

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

## मनपा द्वारे राबविण्यात येत आहे सुशासन आठवडा

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोला:** केंद्र शासनाच्या निर्देशानुसार तसेच मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा दि. १९ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत सुशासन आठवडा साजरा करण्यात येत आहे. या आठवड्या अंतर्गत अकोला महानगरपालिकेतील सर्व विभागातील आपले सरकार पोर्टल आणि पी.जी.पोर्टल वरील सर्व दाखल तक्रारींचे अभियान कालावधीमध्ये १०० टक्के निराकरण अंतर्भूत असून शहरातील नागरिकांनी या सुशासन आठवड्यात सहभागी होऊन शचा लाभ घेण्याचे आवाहन अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा करण्यात आले आहे.

## प्रभू प्राप्तीत कासावीसता आवश्यक-हभप हर्षद बुवा



प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोला:** मनुष्य कोणतेही कार्य आपणास झेपेल तेवढेच करतो. यामध्ये परमार्थ सुद्धा अंगीकृत आहे. यामुळे प्रभू प्राप्तीच्या मार्गात अनेक अडथळे व चंचलता निर्माण होते. म्हणून प्रभू प्राप्तीच्या मार्गात अंतर्मनाच्या कासावीसतेची गरज असून ही गरज भक्ती मार्ग सुकर करीत असल्याचा हितोपदेश हभप हर्षद बुवा जोगळेकर यांनी केला.आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाच्या वतीने किर्तन सेवेकरी स्व. सौ शालिनी वामनराव नाईकवाडे यांच्या स्मृतीत आयोजित तीन दिवसीय कीर्तन महोत्सवास शुक्रवारी स्थानीय प्रमिलाताई ओक हॉल सभागृहात प्रारंभ झाला.यात कीर्तनाचे प्रथम पुष्प पुणे येथील हभप हर्षद बुवा जोगळेकर यांनी सादर करून ठविठ्ठल भक्त जळोजी-मळोजी यांच्या भक्तीवर कीर्तन केले. ते म्हणाले, केवळ भगवंतच नव्हे तर कोणत्याही महान कार्यात चित्ताची कासावीसता आवश्यक आहे. या कासावीसतेच्या भोवती परमार्थ, प्रपंच सगळे फिरतात. ही कासाविसता आपणात आहे काय? या विषयाचा सर्वप्रथम शोध घेणे आवश्यक आहे.

## सीए विद्यार्थ्यांच्या 'अर्थशा' या दोन दिवसीय परिषदेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला :** दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया अंतर्गत विकासा अकोला शाखेद्वारे सीए स्टुडंट्स कॉन्फरन्स 'अर्थशा' या दोन दिवसीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या परिषदेत सीए विद्यार्थ्यांना तांत्रिक तसेच व्यावसायिक दृष्टिकोनातून मोलाचे मार्गदर्शन मिळाले.परिषदेची सुरुवात उद्घाटन सत्राने झाली. उद्घाटनपर भाषणात विकासा अध्यक्ष सीए प्रतीक मंत्री यांनी सीए विद्यार्थ्यांसाठी अशा परिषदांचे महत्त्व स्पष्ट करत आर्टिफिशियल इंटेलिजन्स, स्टार्ट-अप, फॉरेन्सिक ऑडिट, म्युच्युअल फंड्स व कॅपिटल मार्केट्स यांसारख्या विषयांवरील सत्रे विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी कशी उपयुक्त ठरतात, हे सांगितले.यावेळी परिषदेचे प्रमुख पाहुणे पोलीस अधीक्षक आर्चित चांडक होते.

# अकोट नगराध्यक्ष पदावर भाजपची सत्ता कायम

## माया धुळे यांचा ५ २७१ मताने दणदणीत विजय



विशेष प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोट :** अकोट नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या माया विवेक धुळे यांनी विकासाच्या मुद्द्यावर निर्णायक विजय मिळवत भाजपची सत्ता कायम राखली आहे. मतमोजणीअंती माया धुळे यांना १५,९२८ मते मिळाली. प्रतिस्पर्ध्यांवर स्पष्ट आघाडी घेत त्यांनी पुन्हा एकदा नगराध्यक्षपदावर आपले नाव कोरले.

या निवडणुकीत एमआयएम कडून जोरदार लढत देण्यात आली. एमआयएम समर्थित उमेदवार सैय्यद फिरोजाबी शरीफ यांना १०,६५७ मते मिळाली. काँग्रेसच्या अलका संजय बोडखे ८,८५९ मते, तर वंचितच्या स्वाती मंगेश चिखले यांना ६,३१४ मते मिळाली. राष्ट्रवादी अजित पवार गटच्या गाजीया बानो मोहम्मद बदरुज्जमा यांना ७,६०९ मते मिळाली. इतर उमेदवारांना मर्यादित मते मिळाली असून नोटाला ४६६ मते पडली.

### विजयी नगरसेवक

| | |
|---|---|
| प्रभाग १ : | रेश्मा परवीन, युसूफ खान (एमआयएम) |
| प्रभाग २ : | हनान शहा, दिलशाह बी. (एमआयएम) |
| प्रभाग ३ : | आफ्रिन अंजुम (एमआयएम), अब्दुल अकबर (प्रहार) |
| प्रभाग ५ : | मो. आरिफ (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट), सलमा बेगम (काँग्रेस) |
| प्रभाग ६ : | स्नेहल दाभेराव (भाजप), नयना इंगोले (शिवसेना - शिंदे गट) |
| प्रभाग ७ : | अभिजीत कराळे, गंगाबाई चंदन, शारदा मिसळे (भाजप) |
| प्रभाग ८ : | रेणुका खवले, शेख ख्वाजा (काँग्रेस) |
| प्रभाग ९ : | लता कांबळे, खानम मुमताज - वंचित बहुजन आघाडी |
| प्रभाग १० : | दिलीप बोचे, विजया बोचे - शिवसेना (उद्धव ठाकरे गट) |
| प्रभाग ११ : | रजनी अहिर (काँग्रेस), अमोल पालेकर (भाजप) |
| प्रभाग १२ : | शुभांगी टेमझरे, निलेश नवघरे - भाजप |
| प्रभाग १३ : | शेख नगमा, आस्मा अंजुम - काँग्रेस |
| प्रभाग १४ : | निकिता जुनगरे (राष्ट्रवादी - शरद पवार गट), प्रथमेश बोरोडे (भाजप) |
| प्रभाग १५ : | शितल पटके (भाजप), अचल बेलसरे (काँग्रेस) |
| प्रभाग १६ : | सीताबाई मर्दाने, रवीकुमार ठाकूर - भाजप |
| प्रभाग १७ : | सुनिता महल्ले, सुशील पुंडकर - प्रहार पक्ष |

### शहरात जल्लोष

नगराध्यक्षपदावर भाजपचा झेंडा कायम राहताच शहरात भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंद व्यक्त केला. नगरसेवक निवडणुकीतील संमिश्र कौलामुळे आगामी काळात अकोट नगरपालिकेत राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे. विकासाच्या मुद्द्यावर सर्वपक्षीय सहकार्य कितपत मिळते, याकडे अकोटकरांचे लक्ष लागले आहे.

### पक्षनिहाय नगरसेवक संख्या

- भाजप - ११
- काँग्रेस - ६
- AIMIM - ५
- प्रहार - ३
- राष्ट्रवादी (अजित पवार गट) - २
- शिवसेना (उबाठा) - २
- वंचित बहुजन आघाडी - २
- राष्ट्रवादी (शरद पवार गट) - १
- शिंदे शिवसेना - १

### विकासाच्या मुद्यावर कौल

निवडणूक चुरशीची ठरली असली, तरी मतदारांनी विकासाच्या मुद्द्यावर भाजपवर विश्वास व्यक्त केला. विजयानंतर प्रतिक्रिया देताना माया धुळे म्हणाल्या, 'गेल्या नऊ वर्षांत भाजपने अकोट शहराचा कायापालट केला आहे. राज्य व केंद्रात भाजपचे सरकार असल्याने अकोटचा सर्वांगीण विकास अधिक वेगाने करता येईल. जनतेने दाखवलेला विश्वास आम्ही विकासकामांतून सार्थ ठरवू.' नगरसेवक निवडणुकीत मात्र मतदारांनी संमिश्र कौल दिला आहे.

## गुडधी रोडवर चक्रधर कॉलनीत पक्का रस्ताच नाही

### ◆ दहा वर्षे झाली नागरिक त्रास सहन करताहेत

प्रतिनिधी २२ डिसेंबर



**अकोला:** गुडधी रोडवर चक्रधर कॉलनी मधील रहिवाशांना येण्या जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. रात्री अपरात्री तसेच पावसाळ्यात या भागातील लोक जीव मुठीत धरून वाटचाल करीत असतात. हा परिसर आता महापालिका हद्दीत आला परंतु लोकांच्या यातना काही दूर झाल्या नाहीत.

महानगरात प्रभाग क्रमांक ४ मध्ये हा भाग येतो. दहा वर्षांपासून रस्ता झाला नाही. नागरिकांना समस्यांचा सामना करावा लागतो. अजूनही याकडे लक्ष दिले नाही. झाडे झुडपे आजुबाजूला असल्याने साप देखील सारखे निघतात. रस्त्यावर अनेकदा ते दिसतात. पावसाळ्यात तर मुख्य रस्त्यापर्यंत वाहन कसे न्यावे असा प्रश्न रहिवाशांना पडतो. लोकप्रतिनिधींकडे अनेकदा तक्रारी करण्यात आल्या. मात्र काहीही उपयोग झाला नाही. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर या रस्त्याचा प्रश्न नव्याने ऐरणीवर आला आहे. कॉलनीत पक्का रस्ता व्हावा अशी मागणी नागरिक करीत आहेत.

## मुर्तिजापूर नगराध्यक्षपदी भाजपचे हर्षल साबळे



प्रतिनिधी २२ डिसेंबर

**मुर्तीजापुर:** नगराध्यक्ष पदाकरिता हर्षल साबळे यांना बाराव्या फेरीत यश मिळाले. अटीतटीच्या लढतीत भाजपने नगराध्यक्षपदावर आपली पकड कायम राखली. या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शेख इमरान हे पहिल्या फेरीपासून थेट अकराव्या फेरीपर्यंत आघाडीवर होते. त्यामुळे बहुतांश ठिकाणी वंचितचा विजय निश्चित मानला जात होता. मात्र, मतमोजणीच्या अखेरच्या आणि निर्णायक १२ व्या फेरीत अचानक चित्र पालटलं आणि भाजपचे हर्षल साबळे यांनी बाजी मारली. हर्षल साबळे यांना ८८२१ मते मिळाली तर शेख इम्रान यांना ८१०३ मते तर ७१८ मतांनी हर्षल विजयी झाले. १२ व्या फेरीतील मतांची मोजणी सुरू होताच राजकीय वातावरण तापले आणि काही क्षणांतच निकालाचा कल बदलला. या एका फेरीने संपूर्ण निवडणूक चित्रच बदलले.

हर्षल साबळे हे सामान्य कुटुंबातून पुढे आलेले युवा नेतृत्व मानले जातात. त्यांच्या विजयाकडे केवळ निवडणूक यश म्हणून नाही, तर नव्या पिढीच्या राजकारणातील प्रवेशाचे प्रतीक म्हणून पाहिले जात आहे. कार्यकर्त्यांशी असलेला थेट संपर्क, जमिनीवर काम करण्याची शैली आणि संघर्षातून उभं राहिलेलं नेतृत्व हे त्यांच्या विजयामागचं मोठं कारण मानलं जात आहे. तर शेख इमरान यांनी सुद्धा या निवडणुकीमध्ये निसटता विजय मिळवलेला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब गटाचे उमेदवार विनायक गुल्हाने यांना तिसऱ्या क्रमांकावर स्थान प्राप्त केले शरद पवार राष्ट्रवादीचा पाठिंबा असूनही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार विनायक गुल्हाने यांना दुसऱ्यांदा पराभूत सामना करावा लागला तर एकही शिवसेनेचा उमेदवार या निवडणुकीत निवडून आला नाही राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे दोन उमेदवार निवडून आले शिंदे गटाचे शिवसेनेचे दोन उमेदवार तर वंचित बहुजन आघाडीचे सहा उमेदवार अपक्ष म्हणून चार तर भाजपाचे ११ उमेदवार या निवडणुकीत विजय झाले आहे. १२व्या फेरीत घडलेला हा 'गेम-चेंजर' निकाल समोर आल्याने सर्वत्र ठिकाणी या निकालाबद्दल चर्चा होत आहे. काँग्रेस मधून नगराध्यक्ष पदाकरिता अशोक दुबे यांना २२२ मत प्राप्त झाले तर शिंदे गटाचे शिवसैनिक नगराध्यक्ष पदाची उमेदवार म्हणून शुभम मोहोड यांना ७७४ मत मिळाले . अपक्ष म्हणून उमेदवार सुनील पवार यांना नगराध्यक्ष पदाकरिता ३२९ तर नगरसेवक पदाकरिता सुद्धा पराभूतीचा सामना करावा लागला त्याचबरोबर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून कृष्णराव गावंडे यांनी ५०६ मते प्राप्त केली आहे.

## अन्यायकारक वीज दरवाढ लादू नये

### सनातन संस्कृती महासंघाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोला :** महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने सुधारीत वीज दरवाढीच्या प्रकरणाबाबत नागरिकांकडून सूचना तसेच हरकती २७ डिसेंबर २०२५ पर्यंत मागविल्या आहेत. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगातर्फे २ जानेवारी २०२६ पासून याविषयी राज्यातील सहा प्रमुख शहरांत जनसुनावणी घेण्यात येईल. सनातन संस्कृती महासंघाने, मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांना इमेल द्वारा निवेदन पाठवून महावितरण कंपनीच्या प्रस्तावीत वीज दरवाढीचा विरोध केला आहे. निवेदनावर अध्यक्ष ऋषीकेश जकाते आणि उपाध्यक्ष अमित शिरसाट यांची स्वाक्षरी आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात तसेच वीज महाग आहे. त्यामुळे मोठे उद्योग दुसर्या राज्यांचा पर्याय निवडतात. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरण कंपनीला वीजचोरीवर आळा घालावा, वीज गळतीवर नियंत्रण ठेवावे, आस्थापना वरील खर्चात कपात करावी. अश्या अनेक महत्त्वपूर्ण सूचना यापूर्वी वेळोवेळी केलेल्या आहेत. परंतु महावितरण कंपनीच्या इच्छाशक्ती च्या अभावामुळे, दर पाच वर्षांनी वीज दरवाढी संबंधातील हि प्रक्रिया अशीच राबविली जाते आहे. ज्याचा आर्थिक भार वीज ग्राहकांना सहन करावा लागतो.

महावितरण कंपनीचे अनेक रोहित्र, वीज वाहिन्या, खांब तसेच अन्य सामग्री कालबाह्य झाले आहेत. मनुष्यबळाची वानवा हि देखील महत्वाची बाब आहे. त्यामुळे कुठलीही आपत्कालीन परिस्थितीत नसतांनाही रोहित्र जळणे, त्यात वारंवार बिघाड निर्माण होणे, खांब पडणे, वीज पुरवठा खंडित होणे असे प्रकार नेहमी घडतात. अखंड वीज पुरवठा, दर्जेदार आणि तत्पर सेवा हे महावितरण कंपनीचे घोषवाक्य नावापुरतेच असल्याचा अनुभव वीज ग्राहकांना येतो आहे.

निवेदनात पुढे म्हंटले आहे की, वीज ग्राहकांनी वापरलेल्या युनिट्स आकारणीचे दर वर्गवारी नुसार वेगवेगळे आहेत. याव्यतिरिक्त स्थिर, वहन, इंधन समायोजन आकार, वीज शुल्क वेगळे वसूल केले जातात. त्याचे कारण सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या आकलनशक्ती पलीकडचे आहे याचा विचार व्हावा असे म्हटले आहे.







# दिग्गज नेत्यांनी हाती बांधले 'शिवबंधन'

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) दणदणीत पक्ष प्रवेश सोहळा आमदार नितीनबाप्पू देशमुख यांनी घेतला पुढाकार, यश हमखास शंकरराव लंगोटे, राजेश घोगरे यांचा पक्ष सोहळा चांगला चर्चेत**

**अकोला :** उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेत काँग्रेस आणि भाजप नेत्यांच्या प्रवेशाने चांगलीच खळबळ माजली आहे. खडकी या महापालिकेच्या वीस क्रमांकाच्या प्रभागात लंगोटे आणि घोगरे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी उध्दव ठाकरे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी आमदार नितीनबाप्पू देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

उध्दव ठाकरे यांची शिवसेना स्थानिक राजकारणात मोठे फेरबदल घडवून आणत आहे. अकोला जिल्ह्यात शिवसेनेच्या वतीने एका भव्य पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आमदार नितीनबाप्पू देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात समाजसेवक आणि माजी लोकप्रतिनिधींनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. खडकी येथील समाजसेवक शंकरराव लंगोटे आणि माजी जिल्हा परिषद सदस्या मंजुळाताई लंगोटे, यांच्यासह लंगोटे परिवाराचे समर्थक त्याच बरोबर खडकी भागात सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमात अग्रेसर असणारे राजेशभाऊ घोगरे माजी ग्रामपंचायत सदस्या वर्षाताई घोगरे यांच्यासह शेकडो समर्थकांचा पक्षसोहळा रंगला. या दिग्गज नेत्यांसोबतच परिसरातील शेकडो युवक आणि महिलांनीही अधिकृतपणे पक्षप्रवेश केला. कार्यक्रमाला माजी आमदार गजाननजी दाळू गुरुजी, शिवसेना जिल्हा प्रमुख गोपालभाऊ दातकर, शहर प्रमुख आशिष गावंडे, ज्येष्ठ नेते प्रा. संतोष हुशे सर, जिल्हा प्रमुख मंगेशभाऊ काळे आणि शेतकरी आघाडीचे जिल्हा प्रमुख शिवाभाऊ मोहोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच मार्गदर्शक म्हणून सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक केशवराव पातोंड, प्रल्हादराव ढोरे, शंकरराव बिरकड, गजानराव खांबलकर आणि विनायकराव कारंजकर यांनी उपस्थित राहून कार्यकर्त्यांना बळ दिले. यावेळी बोलताना जिल्हा प्रमुख गोपालभाऊ दातकर आणि प्रा. संतोष हुशे सर यांनी पक्ष संघटनेच्या बळकटीवर भर दिला. अध्यक्षीय भाषणात आ. नितीनबाप्पू देशमुख यांनी नवीन सदस्यांचे स्वागत करून आगामी निवडणुकांसाठी सज्ज होण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन भाऊ हरणे यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शनाने या सोहळ्याची सांगता झाली.

### ◆ खडकी प्रभाग १० मध्ये चित्र बदलणार

#### खडकी समस्यामुक्त करणार

◆गेल्या वीस वर्षापासून भाजप सोबत काम करत होतो. ग्रामीण मध्ये पत्नी तालुका उपाध्यक्ष होती. हद्दवाढ झाली तेव्हा आम्ही प्रबळ दावेदार होते. गेल्या निवडणुकीत भाजपाने आम्हाला टाळले. भाजपचे उमेदवार खडकीतून उभे केले ते आम्ही २०१७ मध्ये विजयी केले. पण, त्यानंतर आम्ही विकास कामांसाठी गेलो पण, प्रभागातील नगरसेवकांनी आम्हाला टाळले. त्यामुळे भाजप सोडण्याचा निर्णय घेतला. आमदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनात उध्दवसाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. पक्ष जी जबाबदारी देईल ते आम्ही पुर्ण करु.

**राजेशभाऊ घोगरे**

#### खडकी विकासासाठी एकजुट

◆काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता होतो. दहा ते वीस वर्षापासून काँग्रेस सोबत काम करत आहोत. खडकी गावाचा विकास रखडल्याने आम्ही खडकी गाववासियांनी निर्णय घेतला की हद्दवाढीच्या प्रभागातील विकास करण्यासाठी आम्ही शिवसेनेत प्रवेश केला आहे. सुमारे दोनशे ते तीनशे लोकांनी आमदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनात उध्दवसाहेबांच्या शिवसेनेत आम्ही पक्षप्रवेश केला आहे. महापालिका निवडणुकीत पक्ष जी जबाबदारी देईल ते आम्ही पुर्ण करु.

**शंकरराव लंगोटे**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५

## कागदपत्रांचा डोंगर; कापूस ऑफलाईन नोंदणीला शेतकऱ्यांचा विरोध

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**यवतमाळ** : कापूस 'ई-पीक' पाहणीची नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची 'ऑफलाईन' पाहणी करण्यासाठी भूमी अभिलेख खात्याच्या जमाबंदी आयुक्तांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचनांमुळे विशेषतः विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अनावश्यक हेलपाटे मारावे लागणार असल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. महसूल व वन विभागाने १४ डिसेंबर २०२५ रोजी शासन निर्णय काढून 'ऑफलाईन' कापूस पीक पाहणीला मान्यता दिली असून, त्यानुसार १७ डिसेंबरपासून प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ई-पीक नोंदणीच्या तुलनेत ही प्रक्रिया किमान ३० पट वेळखाऊ ठरणार असून, एका दिवसात होणाऱ्या कामासाठी ३० दिवसांचे अधिकृत वेळापत्रक देण्यात आले आहे. समितीमार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी, शेतकऱ्यांचे जबाब, पंचनामा, कागदपत्रांची पडताळणी अशा किचकट सोपस्कारांमुळे ही प्रक्रिया फेब्रुवारीपर्यंत लांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# यवतमाळ नगर पालिकेवर भाजपाची सत्ता

## नगराध्यक्षपदी प्रियदर्शनी उईके विजयी

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**यवतमाळ** : यवतमाळ नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदासह ५८ नगरसेवकांसाठी झालेल्या निवडणुकीचा निकाल रविवारी जाहीर झाला असून, या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे 'कमळ' यवतमाळ पालिकेवर फुलले आहे. भाजपाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी काँग्रेसच्या प्रियंका मोघे यांचा १२,७१९ मतांनी दणदणीत पराभव करत नगराध्यक्षपदावर आपले नाव कोरले.

शनिवारी पार पडलेल्या मतदानात ५५.४९ टक्के मतदान झाले होते. रविवारी सकाळी धामणगाव मार्गावरील शासकीय तंत्रनिकेतन येथे मतमोजणीस सुरुवात झाली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मतमोजणी केंद्रावर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. निकाल जाणून घेण्यासाठी राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. नगराध्यक्षपदासाठी एकूण नऊ उमेदवार रिंगणात होते, तर नगरसेवक पदासाठी ५८ जागांसाठी तब्बल २९९ उमेदवारांनी निवडणूक लढवली. यामध्ये २५९ उमेदवार विविध राजकीय पक्षांचे, तर ४० अपक्ष उमेदवार होते. महिला उमेदवारांची संख्या १४६ असून पुरुष उमेदवार १५३ होते. अपक्षांमध्ये १५ महिला व २५ पुरुष उमेदवारांचा समावेश होता. या निवडणुकीत भाजपाला २८ जागा मिळाल्या असून काँग्रेस १५ जागांवर समाधान मानावे लागले. शिवसेनेला ७, वंचित बहुजन आघाडीला ३, प्रहारला २ जागा मिळाल्या आहेत. बसपा, एमआयएम व अपक्ष प्रत्येकी एका जागेवर विजयी झाले आहेत.

**प्रभागनिहाय निकाल**

प्रभाग क्रमांक १ 'अ' मधून भाजपाचे श्रीकृष्ण कांबळे यांनी काँग्रेसचे कपिल लांजेवार यांचा पराभव केला, तर १ 'ब' मधून काँग्रेसच्या वनिता बडे विजयी झाल्या. प्रभाग क्रमांक २ 'अ' मध्ये काँग्रेसच्या सविता चव्हाण, तर २ 'ब' मधून वंचितचे आनंद गायकवाड विजयी झाले. प्रभाग ३ 'अ' मधून भाजपाच्या मीना मसराम, तर ३ 'ब' मधून भाजपाचे अश्विन बोपचे विजयी झाले. प्रभाग ४ मध्ये भाजपाच्या साधना काळे व शिवसेनेचे पिंटू बांगर विजयी झाले. प्रभाग ५ मध्ये शिवसेनेचे आकाश परतेकी व शोभा साबळे, तर प्रभाग ६ मध्ये काँग्रेसचे वैशाली सवाई व विशाल पावडे विजयी झाले. प्रभाग ७ मध्ये काँग्रेसच्या करुणा तेलंग व भाजपाच्या श्रद्धा भडके, प्रभाग ८ मध्ये भाजपाच्या लता ठोंबरे व किरण प्रजापती विजयी झाले. प्रभाग ९ मध्ये शिवसेनेच्या चैताली बेलोकार व पूजा गायकी, तर प्रभाग १० मध्ये वंचितच्या मीरा वीर व नीरज वाघमारे विजयी झाले. प्रभाग ११ मध्ये भाजपाच्या स्वाती खंडारे व देविदास अराठे, प्रभाग १२ मध्ये विजय राय व मनीषा भावे, तर प्रभाग १३ मध्ये सुभाष राय व शोभा हर्षे यांनी बाजी मारली.

प्रभाग १४ मध्ये काँग्रेसच्या साधना शंभरकर व बसपाचे विपुल खोब्रागडे विजयी झाले. प्रभाग १५ मध्ये काँग्रेसच्या मो. शाहीन मतीन परवीन व मो. शाकीर मो. नजीब, तर प्रभाग १६ मध्ये काँग्रेसचे जावेद अन्सारी व एमआयएमच्या शे. अंजुम परवीन विजयी झाल्या. प्रभाग १७ मध्ये काँग्रेसच्या शाह तबस्सूम व अपक्ष भारत ब्राम्हणकर, प्रभाग १८ मध्ये काँग्रेसचे अनुप नैताम व अमृता तिवारी विजयी झाले. प्रभाग १९ मध्ये भाजपाचे मुन्ना दुबे व सोनाली तिडके, प्रभाग २० मध्ये माया शेरे व दत्ता कुलकर्णी, तर प्रभाग २१ मध्ये भाजपाचे चंदू चौधरी व शिवसेनेच्या सपना उपगनलावार विजयी झाल्या. प्रभाग २२ मध्ये भाजपाच्या प्रियंका भवरे व नितीन गिरी, प्रभाग २३ मध्ये काँग्रेसचे प्रमोद बगाडे व भाजपाच्या संगीता बोबडे विजयी झाल्या. प्रभाग २४ मध्ये भाजपाच्या शैला मिर्झापुरे व भास्कर केळापुरे, प्रभाग २५ मध्ये काँग्रेसच्या वैशाली उईके व सपना लंगोटे विजयी झाल्या. प्रभाग २६ मध्ये भाजपाचे दिलीप काळे व कीर्ती राऊत, प्रभाग २७ मध्ये रिता धावतोडे व पंकज देशमुख, तर प्रभाग २८ मध्ये भाजपाच्या अर्चना चिंडाले व शिवसेनेचे लोकेश इंगोले विजयी झाले. प्रभाग २९ मध्ये प्रहार संघटनेच्या सोनाली मडावी व बिपीन चौधरी यांनी विजय मिळवला. या निकालामुळे यवतमाळ नगर परिषदेत भाजपाचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे.






# उमरखेड नगरपरिषदेत जनशक्ती पॅनेलचा विजय, नगराध्यक्षपदी तेजश्री जैन

## भाजपाचे नितीन भुतडा यांचा पराभव

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**उमरखेड** : नऊ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर उमरखेड नगरपरिषदेची निवडणूक पार पडली. काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि विदर्भ मराठवाडा विकास आघाडी यांच्या संयुक्त जनशक्ती पॅनेलने भाजपाला धूळ चारत सत्ता काबीज केली. नगराध्यक्षपदासाठी जनशक्तीच्या तेजश्री संतोष जैन यांनी भाजप नेते नितीन भुतडा यांच्या पत्नी निधी भुतडा यांचा ९८४ मतांनी पराभव केला. तेजश्री जैन यांना ११,१०३ मते मिळाली, तर निधी भुतडा यांना १०,११९ मते पडली.


नगरपरिषदेच्या १३ प्रभागांतील २६ जागांसाठी झालेल्या थेट लढतीत जनशक्ती पॅनेलने १७ जागा पटकावल्या, तर भाजपला ९ जागांवर समाधान मानावे लागले. प्रभाग १ मध्ये भाजपचे सुरेंद्र कोडगीरवार आणि जनशक्तीचे संदीप ठाकरे यांना समान मते पडल्याने चिठ्ठी उघडण्यात आली. त्यात सुरेंद्र कोडगीरवार यांचे नाव बाहेर पडले. दुसऱ्या जागेवर ज्योत्स्ना प्रतिक रुडे विजयी झाल्या.

**इतर प्रभागांतील विजयी उमेदवार** : प्रभाग २ : अ. गणीशाहा अन्वर अलि शाहा, फरजाना सैयद रहिम (दोन्ही जनशक्ती). प्रभाग ३ : नाजेरा परविन शे. अकील, मो. साजीदउल्ला जागीरदार (दोन्ही जनशक्ती). प्रभाग ४ : रूपाली सुधीर कवाने, गणेश शामराव खंदारे (दोन्ही जनशक्ती). प्रभाग ५ : वीरेंद्र यशवंत खंदारे (जनशक्ती), वंदना सचिन घाडगे (भाजप). प्रभाग ६ : कविता राहुल काळबांडे (जनशक्ती), विजय हर्डीकर (भाजप). प्रभाग ७ : प्रकाश शिकारे, स्वाती गजेंद्र ठाकरे (दोन्ही जनशक्ती). प्रभाग ८ : खुशबू पवन मेंढे, अमोल तिवरंगकर (दोन्ही भाजप). प्रभाग ९ : राधा कैलास इंगोले (जनशक्ती), गोपाल कलाने (भाजप). प्रभाग १० : करुणा पुंडलीक कुबडे, भास्कर साधू (दोन्ही भाजप). प्रभाग ११ : गजानन रासकर, वैष्णवी सागर लाहेवार (दोन्ही जनशक्ती). प्रभाग १२ : शबाना फरीन वासीफ पठाण, शेख रसुल शेख वाहेद (दोन्ही जनशक्ती). प्रभाग १३ : कुरेशी जुबेर शेख समद, मरियम स. इब्राहिम (दोन्ही जनशक्ती).

२ डिसेंबरला मतदान झाले, तर न्यायालयाच्या आदेशानुसार २१ डिसेंबरला मतमोजणी पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी सखाराम मुळे आणि सहाय्यक अधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांनी प्रक्रिया पार पाडली.

### जनशक्तीच्या विजयाने काँग्रेसला नवजीवन

■ २०१४ पासून सातत्याने पराभव सोसणाऱ्या काँग्रेसला या विजयाने नवी ऊर्जा मिळाली आहे. उबाठा आणि विदर्भ मराठवाडा विकास आघाडीसह तयार केलेल्या पॅनेलने भाजपावर यशस्वी कुरघोडी केली. प्रदेश सरचिटणीस साहेबराव कांबळे, तातू देशमुख, राम देवसरकर, दत्तराव शिंदे, नंदकिशोर अग्रवाल, बाळासाहेब नाईक, इनायत उल्ला जनाब, उबाठाचे ॲड. बळीराम मुटकुळे, अजय नरवाडे, नितीन शिंदे, गोपाल अग्रवाल यांच्यासह जनशक्तीच्या कार्यकर्त्यांनी अथक मेहनत घेतली.



# ढाणकी नगरपंचायत निवडणूक : उबाठाच्या अर्चना वासमवार नगराध्यक्षपदी विजयी

## प्रस्थापितांना धक्का, शहरात समिश्र निकाल

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**ढाणकी** : बहुचर्चित ढाणकी नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष आणि १७ नगरसेवक पदांच्या निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट)च्या अर्चना सुंदरकांत वासमवार यांनी नगराध्यक्षपद पटकावले. त्यांना ३,२०० मते मिळाली. भाजपाच्या शिवनंदा रमेश गायकवाड यांना २,६४९, काँग्रेसच्या रेखा रमेश गायकवाड यांना २,६१२ तर शिवसेना (शिंदे गट)च्या आरती राजू कलाले यांना १,८८३ मते पडली.

अतिशय चुरशीची ठरलेल्या या निवडणुकीत उबाठा गटाला केवळ नगराध्यक्षपदावर समाधान मानावे लागले. त्यांचा एकही नगरसेवक निवडून आला नाही. भाजपने सर्वाधिक ७ जागा जिंकल्या. काँग्रेसला मात्र केवळ २ जागांवर यश मिळाले.

विशेष बाब म्हणजे, ढाणकीच्या राजकारणात प्रथमच प्रवेश करणाऱ्या एमआयएमने ३ जागा पटकावल्या, जो काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे. शिवसेना (शिंदे गट) नेही पहिल्यांदाच लढत दिली असता ३ जागा जिंकल्या. प्रभाग १४ आणि १५ मध्ये मतदारांनी पक्षीय राजकारण नाकारत अपक्ष उमेदवारांना विजयी केले.

मतदारांनी प्रस्थापित नेत्यांना स्पष्ट नकार दिला. प्रभाग ४ मधील काका-पुतण्याच्या लढतीत पुतण्याने बाजी मारली. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बाळासाहेब चंद्रे पाटील यांचा भाजपाच्या उमेदवार असलेल्या त्यांच्याच पुतण्याने मल्हार महेश चंद्रे यांनी पराभव केला. तसेच माजी उपनगराध्यक्ष जहीर जमीनदार यांनाही पराभव स्वीकारावा लागला.

बहुचर्चित प्रभाग १७ मध्ये शिंदे गटाचे दत्त दिगंबर वानखेडे यांनी भाजपाच्या नरेश गंदेवार यांचा पराभव करीत शिंदे गटाचे मनोबल उंचावले.

एकूणच, या निवडणुकीत मतदारांनी समिश्र कौल दिला असून नव्या चेहऱ्यांना संधी देत प्रस्थापितांना धडा शिकवला आहे.



# पुसद नगरपालिकेत राष्ट्रवादीचा विजय

## ॲड.मोहिनी नाईक नगराध्यक्षपदी विराजमान

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**पुसद** : यवतमाळ जिल्ह्यातील पुसद नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) उमेदवार ॲड. मोहिनी इंद्रनील नाईक यांनी काँग्रेसच्या डॉ. मोहम्मद नदीम यांचा ६४५ मतांनी पराभव करत विजय मिळवला आहे.

अटीतटीच्या झालेल्या या लढतीत ॲड. मोहिनी नाईक यांना १२,९८८ मते मिळाली, तर डॉ. मोहम्मद नदीम यांना १२,३४३ मते प्राप्त झाली. भाजपचे उमेदवार निखिल दरवार यांना ८,४९० मते मिळाली.



ॲड. मोहिनी इंद्रनील नाईक या महाराष्ट्राचे राज्यमंत्री तथा पुसदचे आमदार इंद्रनील नाईक यांच्या पत्नी आहेत. त्यांच्या विजयानंतर पुसद शहरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त जल्लोष साजरा केला. फटाक्यांची आतषबाजी करत कार्यकर्ते रस्त्यावर उतरले.

हा विजय पुसदच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाला पुन्हा एकदा अधोरेखित करणारा ठरला आहे. राज्यातील नगरपरिषद निवडणुकांच्या निकालांमध्ये महायुतीला चांगले यश मिळत असतानाच विदर्भात राष्ट्रवादीने आपली ताकद दाखवली आहे.

# पांढरकवड्यात शिवसेनेचे वर्चस्व; नगराध्यक्षपदी भाजपाचे आतिष बोरेले

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**पांढरकवडा** : पांढरकवडा नगरपरिषदेच्या निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले असून, या निकालांनी शहराच्या राजकारणात वेगळेच सत्तासमीकरण निर्माण केले आहे. नगरपरिषदेतील प्रभागनिहाय निकालांत शिवसेनेने स्पष्ट आघाडी घेत आपले संख्याबळ मजबूत केले असले, तरी नगराध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे अतिश उर्फ सोनु बोरेले यांनी अत्यंत अटीतटीच्या लढतीत विजय मिळवत नगराध्यक्षपद पटकावले.

नगराध्यक्षपदासाठी भाजपचे अतिश उर्फ सोनु बोरेले आणि शिवसेनेचे (धनुष्यबाण) उमेदवार डॉ. अभिनय नहाते यांच्यात सुरुवातीपासूनच काट्याची लढत पाहायला मिळाली. प्रत्येक फेरीत मतांचे अंतर अत्यल्प राहिले. अखेर निर्णायक टप्प्यात बोरेले यांनी आघाडी घेत केवळ २०३ मतांच्या फरकाने विजय मिळवला. अतिश (सोनु) बोरेले (भाजप) ७,८२९ मते, डॉ. अभिनय नहाते (शिवसेना) ७,६२६ मते मिळाली. या निवडणुकीत काँग्रेसचे विनोद तिवारी यांना १,४८६ मते, अपक्ष शंकर बडे यांना १,०६६ मते मिळाली. किशोर कनाके (२९०), नौशाद तवर (१४०) आणि मोहन म्यानेवार (५२) अशी इतर उमेदवारांची मतसंख्या राहिली. ९१ मतदारांनी 'नोटा'चा पर्याय निवडला.

प्रभागांमध्ये शिवसेनेचा झंझावात: नगरसेवक निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवारांनी अनेक प्रभागांत भरघोस मते घेत वर्चस्व प्रस्थापित केले. करिश्मा पवन कुडमथे (१,३०० मते) आणि सरफरजुद्दीन एनुद्दीन (१,३०२ मते) हे या निवडणुकीतील सर्वाधिक मते मिळवणारे उमेदवार ठरले. चव्हाण अतिश तानाजी (१,२४०), शेंडे जयश्री अतिश (१,१०९), कटकमवार सुरेखा रमेश (९९१) आणि खान शैनीला सधीन समीर (९८८) यांनीही लक्षणीय विजय मिळवला.

**महिला उमेदवारांचा प्रभाव** : या निवडणुकीत महिला उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात यश संपादन केले. विजयी उमेदवारांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय असून, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे नेतृत्व अधिक बळकट होत असल्याचे चित्र निकालांतून स्पष्ट झाले.

शिवसेनेची आघाडी असली तरी भाजपनेही अनेक प्रभागांत आपली ताकद कायम राखली. भाजपच्या शीतल संदीप बाजोरीया (९८२), रेखा रामभाऊ चितालेवार (९४०) आणि मंगेश रमेश वातीले (७९८) यांनी विजय मिळवत पक्षाची उपस्थिती ठळक केली.



### विजयाचा जल्लोष, विकासाला प्राधान्य

■ निकाल जाहीर होताच शहरात भाजप व शिवसेना कार्यकर्त्यांकडून जल्लोष करण्यात आला. ढोल-ताशे, फटाके, गुलाल आणि घोषणाबाजीने पांढरकवड्याचे वातावरण दुमदुमून गेले. विजयानंतर बोलताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष अतिश (सोनु) बोरेले यांनी, "हा विजय वैयक्तिक नसून शहरातील जनतेचा आहे. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आणि प्रलंबित विकासकामांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल," असे आश्वासन दिले. नगरपरिषदेत शिवसेनेचे संख्याबळ आणि नगराध्यक्षपदी भाजपचा विजय यामुळे पांढरकवड्यात आगामी काळात राजकीय समन्वय आणि सत्तासंतुलन कसे घडते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# हदगाव नगर परिषदेच्या अध्यक्षपदी रोहीणी वानखेडे

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**उमरखेड** : हदगाव नपाच्या चुरशीच्या लढतीत शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या रोहीणी भास्कर वानखेडे हे विजय झाल्या असून त्यांनी काँग्रेसच्या उमेदवार कुमुद सुनील सोनुले यांचा १२९३ मतांनी पराभव केला असून नगराध्यक्ष पदी विराजमान झाल्या. शिवसेना (शिवसेना उबाठा गट)च्या उमेदवार ह्या तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या आहेत.

सुरुवातीपासूनच काँग्रेस शिवसेना एकनाथ शिदे गट) शिवसेना (उबाठा) ह्यांच्यात तिरंगी लढत असल्याचे चित्र यापूर्वी स्पष्ट झाले होते. तसेच विशेष म्हणजे नवनिर्वाचित हदगाव नगर परिषदेच्या नगराध्यक्ष रोहीणी भास्कर वानखेडे या मा.खा.सुभाष वानखेडे यांच्या सुनबाई असून ह्या विजयामुळे माजी खा. सुभाष वानखेडे यांच्या राजकीय घौडदोड नव्यानेच सुरुवात झाल्याच चित्र स्पष्ट दिसत आहे.

झालेल्या नगर परिषदमध्ये सर्वाधिक जागा उबाठा गटाच्या वाट्याला ७ आल्या तर शिवसेना शिंन्दे गटाला ५ मिळविता आल्या आहे. काँग्रेस पक्षाला ५ वर समाधान म्हणावे लागेल तर भाजपा ४ जागा पैकी ३ जागावर उमेदवार निवडुण आनण्यात यश प्राप्त झाले आहे.

**आ. बाबुराव कोहळीकर यांचे महत्त्वपूर्ण भूमिका** : हदगाव नगर परिषद निवडणुकीत माजी खासदार सुभाष वानखेडे यांचे राजकीय अस्तित्व संपले असे त्यांचे विरोधक करत होते. हदगाव नगर परिषदेवर यापूर्वी काँग्रेसची दहा वर्ष सत्ता होती. माजी आ.जवळगावकर व विद्यमान शिवसेना (शिवसेना उबाठा गट) हिंगोलीचे लोकसभेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे प्राबल्य असल्याने शिवसेना शिंदे गटाला ही निवडणूक फार जड जाणार हे भाकीत असतानाही माजी खा.सुभाष वानखेडे आणि हदगाव हिमायतनगर तालुक्याचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी शहरातील प्रत्येक प्रभागात जाऊन विशेषता अल्पसंख्याक प्रभागात लक्ष केंद्रीत करून अनेक नागरिकांच्या नागरी समस्या जाणून घेतल्या परिणाम स्वरूप नगराध्यक्ष हे विजय खेचून आणला हे आवर्जून उल्लेख करावा लागेल. गोरगरीब कष्टकरी शेतमजूर शेतकरी तळागाळातील जनसामान्य जननी मदतीचा हात देऊन सुशिक्षित असलेली रोहीणीला नगराध्यक्षपदी विराजमान केले हे विशेष ठरले.



# वणी नगरपालिकेत भाजपाचा डंका; विद्या आत्राम नगराध्यक्षपदी विजयी

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**वणी** : वणी नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता पटकावली. नगराध्यक्षपदाच्या थेट लढतीत भाजपाच्या विद्या आत्राम यांनी १५,३७७ मते घेऊन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट)च्या संचिता नगराळे (१०,५८५ मते) यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला.

नगराध्यक्षपदासह बहुतांश प्रभागांमध्ये भाजपाने घवघवीत यश मिळवले. प्रभाग ३, ४, ५, १०, ११ आणि १२ मध्ये भाजपाने सर्व जागा जिंकल्या. प्रभाग १ मध्ये शिवसेना (उबाठा)ने दोन्ही जागा पटकावल्या, तर प्रभाग १३ मध्ये काँग्रेसने दोन्ही जागांवर विजय नोंदवला.


प्रभाग २ आणि ९ मध्ये अपक्ष उमेदवारांनी बाजी मारली, तर प्रभाग १४ मध्ये संमिश्र निकाल लागला. येथे भाजपाच्या मनिषा गव्हाणे यांनी अवघ्या तीन मतांनी विजय मिळवला, जो या निवडणुकीतील वैशिष्ट्य ठरला.

एकूणच, वणी नगरपालिकेवर भाजपाचे ठोस वर्चस्व प्रस्थापित झाले असून नगराध्यक्षपदावरील दणदणीत विजयाने पक्ष कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि. २२ डिसेंबर २०२५

# विरोधकांचा चुराळा, विजयी धुराळा





# महाविकास आघाडीची हार, महायुतीचा 'चौकार'!

## *पाच पैकी चार जागांवर महायुती तर एक जागा एमआयएमकडे








● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यातील वाशीम, रिसोड, मंगरूळपीर आणि कारंजा (लाड) या चार नगर पालिकेसह मालेगाव नगर पंचायतीक या झाललेल्या निवडणूकीतील मतदानाची मतमोजणी रविवार २१ डिसेंबर रोजी पार पडली-सर्वच राजकीय व प्रादेशिक पक्षाने ही निवडणूक प्रतिष्ठेची केल्यामुळे या निवडपुकीच्या निकालाची जिल्हावासीयांना प्रतीक्षा होती. नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदासाठी सुधा ही निवडणूक अटीतटीची व त्यांचे भविष्य निर्माण करणारी असल्या या निवडणुकीचा निकाल सुधा अनेक इच्छुकांसह त्यांच्या गॉडफादरच्याही भवितव्याची होती वाशीम नगर पालिका निवडणूकीत नगराध्यक्ष पदासाठी भाजपचे अनिल केंदळे आणि शिवसेना उबाठाच्या सौ रेखा सुरेश मापारी यांच्या मध्ये लढत झाली या प्रतिष्ठेच्या निवडणूकीत भाजपचे अनिल केंदळे यांचा ८ हजार मतांनी विजय झाला. रिसोड पालिकत भाजपने उमेदवार भगवानराव क्षीरसागर आणि महाविकास आघाडीने बाळासाहेब देशमुख यांच्यात लढत झाली. यामध्ये भगवान क्षीरसागर विजयी झालेत. कारंजात भाजपा व एमआयएमची लढत झाली. एमआयएमने बाजी मारली. मंगरूळपीरमध्ये भाजपा व राष्ट्रवादी थेट लढत झाली. परळीकर यांचा विजय झाला. मालेगावात शिंदे सेनेचा झेंडा नगर पालिकेवर फडकला.




जिल्ह्यातील वाशिम, कारंजा, रिसोड, मंगरूळपीर नगरपरिषद तसेच मालेगाव नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया २१ डिसेंबर रोजी शांततापूर्ण व सुरळीत वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाहीर केलेला निकाल पुढील प्रमाणे आहे. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक–२०२५ : विजयी उमेदवारांचा तपशील जाहीर करण्यात आलेल्या निकालानुसार विविध प्रभागांतून पुढील उमेदवारांनी विजय मिळविला आहे.

### वाशिम नगर परिषद

केंदळे अनिल माधवराव, भारतीय जनता पार्टी – २३९४२ ,ताजने अनिल नारायण, भारतीय जनता पार्टी – १४५३ ,वाटाणे अरुणा वसंतराव, भारतीय जनता पार्टी – १३२१, कल्ले करुणाबाई राजू, शिवसेना (उबाठा) – १०६१, लोनसुने कासाबाई मधुकर, भारतीय जनता पार्टी – १०५१ ,तुपसांडे राहुल मोतीराम, भारतीय जनता पार्टी – १५४५ खंडेलवाल पुजा विनोद, भारतीय जनता पार्टी – १९२६, बढेल सोनू कन्हैया, शिवसेना (उबाठा) – ९३४ ,हेडा कुणाल अशोक, भारतीय जनता पार्टी – १२५७ , गजानन काशीराम पाटील (दहात्रे), शिवसेना (उबाठा) – ९२०, ठाकूर अंजली भानुप्रताप, भारतीय जनता पार्टी – १०८६, श्रध्दा अमोल इंगोले, शिवसेना (उबाठा) – २३०१,पूरण लालचंद बदलाणी, शिवसेना (उबाठा) – २२०१, इंगोले गोकुळाबाई रतन, शिवसेना (उबाठा) – १३३०, राठी नितेश सतीश, भारतीय जनता पार्टी – १४०२, मंदाकिनी वैभवसिंग ढवळे, भारतीय जनता पार्टी – १३९८, सतिश (गल्ला) वानखेडे, भारतीय जनता पार्टी – १०४२, भालेराव पुजा राजरत्न, भारतीय जनता पार्टी – ७४४, शेख रशीद शेख श्हानूर, शिवसेना (उबाठा) – १०२३, वाघमारे माया रुपेश, भारतीय जनता पार्टी – ८१४, भांदूर्गे राजु विठोबा, शिवसेना (उबाठा) – १०७९, सारडा जयश्री कपिल, भारतीय जनता पार्टी – १३३५, लांडगे गजानन प्रभाकर, अपक्ष – ७७९, वानखेडे जयश्री संतोष, भारतीय जनता पार्टी – १३३४, काळे पूजा विशाल, शिवसेना (उबाठा) – ११५९, राजू नामदेवराव वानखेडे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस – १०८३ ,शे खाजगी सुरु, ऑल इंडिया मजलिस इत्तेहदूल मुस्लिमीन – १०२३, मुरकुटे संतोष पांडुरंग, भारतीय जनता पार्टी – १५६१, हजारे वर्षा नामदेव, शिवसेना (उबाठा) – १६१४ ,अह्मद शहेनाजबी ज. झुल्फेखार, ऑल इंडिया मजलिस इत्तेहदूल मुस्लिमीन – १४८१, मिर्झा साबिर बेग मिर्झा सगीर बेग, शिवसेना (उबाठा) – १४१६, गोरे कृष्णाताई कैलास, शिवसेना (उबाठा) – १४०८, मडके नितीन चंद्रकांत, शिवसेना (उबाठा) – १३८१,निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली देवकर यांनी विजयी उमेदवार घोषीत केले.

### रिसोड नगरपरिषद

इंडियन नॅशनल कॉंग्रेस पक्षाकडून फरहाना परविन शेख समीर – १०५९, सिंकदर खान ख्वाजा खान – ७३० ,दांदडे सुरेखा रवि – ६९१, बंडु रामकिसन वानखडे – ६१४, वानखेडे शितल बंडू – ११२२, शबाना बी. रियाज खान – १५६६, महेफुजा परवीन अब्दुल अजिज – १२८०, अकबर खान अफसर खान – १३३०,शिवसेना पक्षाकडून संतोष लक्ष्मण चऱ्हाटे – ८७०, क्षीरसागर लक्ष्मी सागर – ७८५, रुपाली भारत भगत – ८३४, विजय विष्णु जाधव – ९७०, विष्णू भगवान कदम – ११३९, भारतीय जनता पार्टीकडून माधुरी स्वप्निल इरतकर – ७५०, किरण भगवान क्षीरसागर – ९०४ ,प्रिती रामेश्वर जोगदंड – ८८८ ,स्नेहा अमोल लोथे – ९५८, केदारे वैदेही शिवशंकर – ६२६, बगडिया संजय राधेश्याम – ५६६, नकवाल जया अमोल – ९५९, कृष्णा लिंगाप्पा आसनकर – ९४०, डांगे शामली सागर – १०२७, अपक्ष उमेदवार इरतकर सतीश सुरेश – ८६८, निवडणूक निर्णय अधिकारी प्रतीक्षा तेजनकर यांनी विजयी उमेदवार घोषीत केले.




### कारंजा नगरपरिषद

पुंजानी फरीदाबानू मोहम्मद शफी – १६,८३२, खान रुबिना परीन इरफान – २,५७८, ठाकरे शालीनी प्रशांत – २,५१८, विराणी सलमान रफीक – २,२०७ ,आसमा परवीन अब्दुल नईम – २,१९५, गढवाले अमोल बानो समीउल्लाह खान – २,१८४, यासमीन – २,१५२, शेख जाकीर इशाक – २,१४५, पुंजानी मोहम्मद बिलाल मोहम्मद युसुफ – १,९२४, हसीना बानो ज. इरशाद अली – १,८५७, पप्पूवाले हुसेन जंगली – १,८५०, राठोड ज्योतीबाई प्रवेश – १,७४२, पुंजानी फरीदाबानू मोहम्मद शफी – १,६८३ , खेतीवाले शाहीन सुभान – १,६४५, अंभोरे सागर रामदास – १,६१६, धार्डीकर वंदना पवन – १,४८२, गुल्हाने वैशाली अतुल – १,४७३, खंडारे दुर्गा हेमराज – १,४७८, गाडगे सत्यजीत कृष्णराव – १,४०४, गढवाले नितीन अशोक – १,३६९, अघम कुसुम शालिग्राम – १,३४९, शेकुवाले फिरोज छट्ट – १,३७२, पारेख मोहम्मद इमरान मोहम्मद – १,२३५, कोळकर चंदा भीमराव – १,१७२, बेनजीर रहीमा रहेमत बेग – १,१४१, गायकवाड प्रमोद सदाशिव – १,१०७, भेलांडे वर्षा मनीष – १,०६९, आसिया तरन्नुम – ९७९, थद्दानी सच्चानंद हरिराम – ८५८, डेन्डूळे कांचन यशुदास – ८५६, खान अनिसखा बशीरखा – ८४१, अहेमद नदीम अहेद अनीस अमन शाह सुरेश – ७७२, श्रीवास अजय दशरथ – ७६१, निवडणूक निर्णय अधिकारी कैलास देवरे यांनी विजयी उमेदवार घोषीत केले.

### मालेगाव नगरपंचायत


खुरसडे ओमप्रकाश मधुकर, शिवसेना – ३७५२ डाखोरे वनमाला प्रेमानंद, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस – २७३, शेख सलिमाबी हारुन, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस – ४४८, बळी संजय रामभाऊ, भारतीय जनता पार्टी – ४१९, , गायकवाड राधा दयाराम, शिवसेना – ३०५, काटेकर ज्ञानेश्वर रमेश, भारतीय जनता पार्टी – ४६९ , खवले राधा महादेव, शिवसेना – ३६४, घुगे प्रियंका अभय, शिवसेना – २२४, बाणाईतकर विनोद माणिकराव, भारतीय जनता पार्टी – १६८ ,गुजरे इंदिराबाई कैलास, शिवसेना – ४६५, सोभागे ज्योति सखाराम, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस – २२८ ,खान आझाद अझिजखान, शिवसेना – ५६७, सारडा सविता संजय, शिवसेना – ४०९,काळे रज्जू गजानन, शिवसेना – २२७ ,घुग सोनाजी रामेश्वर, शिवसेना – २५९,शाह मरयमबी साबिर शाह, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस – ३७२, निवडणूक निर्णय अधिकारी दीपक पुंडे यांनी विजयी उमेदवार घोषीत केले.


### मंगरूळपीर नगरपरिषद

परळीकर अशोक महादेवराव, नॅशनॅलीस्ट कॉंग्रेस पार्टी – ९०४४,चितलांगे लता पुरुषोत्तम, भारतीय जनता पाटी – ९४४, गावंडे अनिल विठ्ठलराव, भारतीय जनता पार्टी – १०९४, फेसल खान शफी खान, अपक्ष – ७३६, सायराबानो जा शब्बिरखा, नॅशनॅलीस्ट कॉंग्रेस पार्टी – ९७८, बिलाल अहमद अकील अहमद, अपक्ष – ५२९, शबाना परवीन मिर्जा अजहर बेग, इंडियन नॅशनल कॉंग्रेस – ८२४, शेर बानो मोहम्मद जमीर कुरेशी, नॅशनॅलीस्ट कॉंग्रेस पार्टी – ११८६, नसीम परवनी लतीफ खान, नॅशनॅलीस्ट कॉंग्रेस पार्टी – १०१५, सालेहा खदिजा अब्दुल वाहिद, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन – ८९४, फरहाना परवनी आसिफ खान, अपक्ष – ८४७, बजाज सपना गणेश, शिवसेना – ५५२, घोडचर सुधीर गजानन, भारतीय जनता पार्टी – ५४२,भोजने प्रतिमा चंद्रशेखर, भारतीय जनता पार्टी – ६६१, ठाकुर विरेंद्रसिंग विठ्ठलसिंग, भारतीय जनता पार्टी – ५८२, परळीकर किरण अशोक, नॅशनॅलीस्ट कॉंग्रेस पार्टी – १००९ ,श्रीहरी प्रकाशराव इंगोले, भारतीय जनता पार्टी – ७७७ ,खोडे रुपाली मनोज, भारतीय जनता पार्टी – १०७३ ,राजु नंदलाल जयस्वाल, भारतीय जनता पार्टी – १०२६, खोडे गणेश रामचरण, भारतीय जनता पार्टी – १०३८ , हरिहर वैशाली संदीप, नॅशनॅलीस्ट कॉंग्रेस पार्टी – १०८० ,पवार आशाबाई महादेवराव, भारतीय जनता पार्टी – ९१४, निवडणूक निर्णय अधिकारी राजेंद्र जाधव यांनी विजयी उमेदवार घोषीत केले.

## रिसोड न.प. महायुती एक हाती सत्ता अनंतराव देशमुख यांचा कायम जागंडगुत्ता!

● राहुल जुमडे @ रिसोड ●





जिल्ह्याची राजकीय राजधानी म्हणून ओळख असलेल्या रिसोड नगर परिषद निकालाकडे संपूर्ण जिल्ह्यचे लक्ष वेधले होते. माजी खासदार अनंतराव देशमुख आणि विद्यमान विधान परिषद सदस्य आ. भावना गवळी यांच्यासाठी रिसोड नगर परिषद प्रतिष्ठेची होती तर विद्यमान कॉंग्रेसचे आमदार अमित झनक यांना अस्तित्व शाबूत राखण्यासाठी तेव्हढीच महत्त्वपूर्ण होती. त्यामुळे रिसोडाकडे साहाजिकच संपूर्ण जिल्ह्याचेच नव्हे; तर महाराष्ट्राचे लक्ष वेधले होते. मात्र या निवडणुकीत नेहमी प्रमाणे माजी खा. अनंतराव देशमुख यांनी आ. भावना गवळी यांना सोबत घेवून जागंडगुत्ता करीत एक हाती सत्ता मिळविली आहे.

रिसोड येथे एकूण २३ जागांपैकी ९ जागी भाजपा, ८ जागांवर कॉंग्रेस तर ५ जागांवर शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक विजयी झाले आहेत. तर एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या निवडणुकीत अखेर भाजपचे भगवानराव क्षीरसागर हे विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी बाळासाहेब उर्फ सुधाकर देशमुख यांना ९१३ मतांनी पराभवाचा सामना करावा लागला. नगराध्यक्ष पदाचा उमेदवार



विजयी घोषित होताच महायुतीच्या समर्थकांनी जल्लोष साजरा केला.



## परळीकरांची घडी, सत्तेत पुन्हा उडी!

● रमेश मुंजे @ मंगरूळपीर ●

मंगळरूळपीर पालिका निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस अजितदादा पवार गटाचे उमेदवार अशोक परळीकर यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपाचे उमेदवार डॉ. दिलीप रत्नपारखी यांना हजार मतांनी पराभव करुन मंगरूळपीर पालिकेवर आपले निर्विवाद वर्चस्व कायम ठेवले आहे या विजयासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांतदादा ठाकरे माजी मंत्री सुभाषराव ठाकरे यांचेसह त्यांच्या अनेक सहकारी मंडळीने अथक परिश्रम घेवून भाजपचे वाशीमचे आमदार श्याम खोडे यांना या चमत्कारीक विजयातून चपराक दिल्याची चर्चा आहे.तर परळीकरांनी मंगरूळपीर नगर पालिकेवर घडी पुन्हा बसली असून सत्तेतही उडी मारली आहे.





## विरोधक झाले तंग, कारंजात उडाला पंतग!







● किरण क्षार @ कारंजा ●

कारंजा नगरपरिषदेची निवडणूक अतिशय रंगतदार व अतितटीची झाली असून निवडणुकीचा निकाल लागेपर्यंत कोण विजय होईल हे सांगता आले नाही.भाजप आणि एम आय एम या पक्षामध्ये अतिशय काट्याची टक्कर झाली. आणि या रोमांचक लढाईमध्ये विजय मात्र हा एम आय एम पक्षाचा झाला. या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी, ए.आय.एम. आय.एम तसेच राष्ट्रवादी (अजित दादा गट) अशी त्रिकोणी लढत होण्याची शक्यता होती.पण लढत मात्र भाजप व पतंग मध्ये झाली.झालेले या निवडणूक मध्ये भाजप पक्षाचे १३ उमेदवार निवडून आले,ऐ आय एम आय एम पक्षाचे १६ उमेदवार निवडून आले,राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजितदादा गट) या पक्षाचा १ उमेदवार तर घाटंजी विदर्भ या पक्षाचा १ उमेदवार निवडून आला. महाराष्ट्रात कारंजा नगर पालिकेवर एकमेव एक हाती एमआयएमने सत्ता मिळवून देशाचे लक्ष वेधले आहे. एमआयएमने विरोधकांना तंग करत कारंजा नगर पालिकेवर पतंग उडविला आहे. त्यामुळे आता सत्तेचे समिकरण बदलले आहेत.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com




तेल्हारा येथे विजयाचा आनंद साजरा करतांना नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकर्ते


# सांघिक प्रयत्नांतून विजयाची संकल्प सिद्धी - आमदार रणधीर सावरकर


## नगरपालिका निवडणुकीत महायुतीचे अभूतपूर्व यश !

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोला:** नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीत जनतेने भारतीय संस्कृती, विकास आणि सुशासनाच्या विचारांवर पुन्हा एकदा आपला विश्वास अधोरेखित केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने या निवडणुकीत ध्येयवादी राजकारणाचा विजय मिळवला असून, हा केवळ आकड्यांचा विजय नसून तो सामान्यांच्या सेवेसाठी केलेल्या 'सांघिक कार्याचा' विजय आहे, असे प्रतिपादन भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर यांनी येथे केले.

सांघिक शक्तीचा विजयोत्सव अकोल्यातील लोकनायक जयप्रकाश नारायण चौक येथे अत्यंत सात्विक आणि उत्साही वातावरणात विजयोत्सव साजरा करण्यात आला. 'हा विजय कोणत्याही एका व्यक्तीचा नसून, 'बूथ' स्तरावर अहोरात्र राबणाऱ्या कार्यकर्त्यांच्या परिश्रमाचे फळ आहे,' असे आ. सावरकर यांनी नमूद केले. यावेळी भारतमातेचा जयघोष आणि गुलाल





उधळत कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. अंत्योदय आणि विकासाचे राजकारण खासदार अनुप धोत्रे यांनी यावेळी स्पष्ट केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेला 'सबका साथ, सबका विकास' हा मंत्र आणि मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेली जनहिताची कामे यामुळेच जनतेने महायुतीला भरभरून आशीर्वाद दिला आहे. महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवून देशाच्या प्रगतीत योगदान देणे हेच आमचे अंतिम ध्येय आहे.

नकारात्मक नरेटिव्हचा पराभव विजय अग्रवाल यांनी विरोधकांच्या भूमिकेवर प्रहार करताना सांगितले की, 'ज्यांनी केवळ सत्तेसाठी विचारधारा सोडली आणि खोटे नरेटिव्ह पसरवले, त्यांना सुज्ञ मतदारांनी नाकारले आहे. नकारात्मकतेला भारतीय समाजात स्थान नाही, हेच या निकालातून स्पष्ट झाले आहे.' संघटनेचा कणा जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर यांनी मुख्यमंत्र्यांच्या परिश्रमांचे कौतुक करताना सांगितले की, कार्यकर्त्यांच्या या निवडणुकीत मुख्यमंत्री स्वतः एका स्वयंसेवकाप्रमाणे मैदानात उतरले होते. त्यांनी ५० पेक्षा अधिक सभा घेतल्या. महायुतीने मिळवलेल्या १२५ पेक्षा अधिक जागा आणि अकोला जिल्ह्यातील निर्भेळ यश हे 'लोकसंग्रहाच्या' कामाची पावती आहे.

भाजपा जिल्हा कार्यालयासमोर लोकनायक जयप्रकाश नारायण चौक भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर खुलेनाट्यगृहस मोर झालेल्या विजयोत्सवावेळी ते बोलत होते.

### महापालिकेत सेवाधर्म पाळणार -खा.अनुप धोत्रे

महापालिका निवडणूक या विजयाचा उत्साह कायम ठेवत आगामी काळात होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीतही 'सेवेचा धर्म' पाळून भाजपा महायुती विजयाची परंपरा कायम राखेल, असा विश्वास आ. रणधीर सावरकर यांनी व्यक्त केला. नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत मतदारांनी विकासाच्या मुद्द्यावर भारतीय जनता पार्टीला कौल दिला आहे. राज्यात पायाभूत सुविधा विकासाची मोठी कामे महानगरांमध्ये सुरु आहेत. याच कामांच्या आधारावर महापालिका निवडणुकीतही मतदार विकासाच्या मुद्द्यावर महायुतीला विजयी करतील, असा विश्वासही श्री. खासदार अनुप धोत्रे यांनी व्यक्त केला. जिल्ह्यात पालकमंत्री आकाश फुंडकर, भाजपा निवडणूक प्रभारी आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकले, आमदार हरीश पिंपळे, यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक सर्व कार्यकर्त्यांनी अतिशय ताकदीने लढली. या विजयाचे सर्व श्रेय हे , कार्यकर्ते, पदाधिकारी, बूथ कार्यकर्ते आणि अर्थातच मतदारांचे आहे. नागरिकांच्या समस्या दूर करून आगामी महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाला प्रचंड यश मिळेल जनतेचा आशीर्वाद प्राप्त अशी ग्वाही खासदार अनुप धोत्रे यांनी दिली.

ढोलताशांचा गजर करत ,गुलाल उधळत, मिठाई वाटप करीत भाजपाचा विजय साजरा करण्यात आला. यावेळी खासदार अनुप धोत्रे, भाजपा जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, महानगराध्यक्ष जयंत मसने, विजय अग्रवाल, डॉ. अमित कावरे, वैशाली शेळके, माधव मानकर, गिरिश जोशी, संजय गोटफोडे, अंबादास उमाळे, अॅड.देवाशिष काकड, आम्रपाली उपरवट , राजेश नागमते, गोपाल मोहोड , प्रवीण हगवणे, तुषार भिरड, गोपाल मुळे, नितेश पाली, नितीन राऊत, अमोल गीते, पवन पाडीया , रमेश अलकरी, संदीप गावंडे, यांच्यासह शेकडो भाजपा कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील नवनर्वाचित नगराध्यक्ष



माया धुळे
अकोट भाजपा



वैशाली दीपक पालिवाल
तेल्हारा भाजपा



सुलभा रमेश दुतोंडे
हिवरखेड भाजपा



हर्षल साबळे
मूर्तिजापूर भाजपा



अत्तर खातून अलिमुद्दीन
बार्शीटाकळी वंचित



डॉ. आफरीन मो. जमीर
बाळापूर काँग्रेस

# बाभुळगाव मळसुर रस्त्यावर व कडेला शेकडो खड्डे

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**आलेगाव :** आलेगाव बाभुळगाव मळसुर वाहतूक रस्त्यावरील डांबर अती पावसामुळे,वाहून गेल्याने सदर रस्ता वाहन चालकासह प्रवाशांना जीवघेणा बनला आहे.संबंधित प्रशासनाने पुलाजवळील खड्ड्यांमध्ये डांबरीकरण करणे गरजेचे असताना खड्ड्यांमध्ये थातूरमातूर मुरूम भरून मलम पट्टी करण्याचे काम सुरू केले आहे.त्यामुळे प्रवाशांचा प्रवास धोक्याचा कायमच असल्याचे चित्र आहे.

बाभुळगाव ते आलेगाव आणि आलेगाव ते मळसूर रस्ता अती वाहतुकीचा असून सदर रस्त्यावरून शाळा,कॉलेज चे विद्यार्थी तसेच व्यापार निमित्ताने असंख्य व्यापारी आणि शेकडो प्रवाशांची रेलचेल असते.तसेच चांनि पोलिसांना मळसूर मार्गे आलेगाव येथे सुरक्षा,पेट्रोलिंग



निमित्ताने याच मार्गाने यावे लागत असते परंतु सदर मार्गावर भयंकर खड्डे असल्यामुळे,वेळेचे बंधन पाळणे कठीण होत असल्यामुळे बरेच वेळा पोलिसांना सुरक्षा,पेट्रोलिंग करीता कठीण होत असल्याचे समोर आले आहे.तसेच गेल्या काही वर्षांपासून बाभुळगाव ते आलेगाव रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून जागोजागी मोठमोठे खड्डे पडून रस्ता प्रवाशांसह वाहन चालक यांच्या करीता जीवघेणा बनला आहे.तसेच निर्गुणा नदीवरील पुलावरील सुरक्षा कठडे,तसेच रस्त्याखालील मातीचा भराव या वर्षीच्या पुराच्या तडाख्याने पाण्यात वाहून गेल्याने प्रवाशांची सुरक्षाच धोक्यात आली आहे.या घटनेला जवळपास तीन महिन्याचा कालावधी उलटून गेला परंतु अद्याप पावेतो संबंधित प्रशासना कडून थातूरमातूर खड्डे भरण्याशिवाय कामच झाले नसल्यामुळे,सदर रस्त्यावरून वर्दळ असणारे विद्यार्थी, प्रवासी,व्यापारी,शेतकरी शेतमजूर,पोलिस प्रशासन आदींना जीवधोक्यात घालवून आपला प्रवास पूर्ण करीत आहेत. गेल्या काही वर्षांपासून बाभुळगाव आलेगाव ते मळसूर रस्त्यावर शेकडो खड्डे पडले त्यामुळे,सदर रस्ता प्रवाशांसह सह रुग्णवाहिकेतील रुग्णाला धोकादायक आहे. ही बाब गंभीर असून या कडे खासदार आमदार यांनी वेळीच लक्ष दिले असते तर सदर रस्त्याची दुरुस्ती होऊन डांबरीकरण होऊन प्रवासी व वाहन चालकांना सोईचे झाले असते.असे जनतेमध्ये बोलले जात आहे.

# रिक्त पदांच्या भरतीसाठी बोर्डाचे कर्मचारी संपावर

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोला :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कार्यालयांमधील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, तसेच प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र बोर्ड कर्मचाऱ्यांनी बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. नाशिक येथील मंडळ कार्यालयासह राज्यातील सर्व विभागीय मंडळ कार्यालयांमध्ये बुधवारपासून संपावर गेले आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे अंतर्गत कार्यरत नऊ विभागीय मंडळ कार्यालयांमध्ये मंजूर असलेल्या तृतीय श्रेणी कनिष्ठ लिपिकांच्या एकूण ५९१ पदांपैकी सुमारे ३५० ते ३७० पदे सध्या रिक्त आहेत. यामोठ्याप्रमाणातील रिक्त पदांमुळे कार्यरत असलेल्या मोजक्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढला असून, त्याचा थेट परिणाम कार्यालयीन कामकाजाच्या गतीवर होत आहे. अनेक लिपिकांना आपल्या नियमित कामासोबतच अतिरिक्त जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

# अकोल्यात मराठा सेवा मंडळाचा 44 वा मेळावा

## ◆ वधू-वर परिचय मेळावा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोला :** गेल्या ४३ वर्षांची गौरवशाली परंपरा जपत, मराठा सेवा मंडळ अकोलाच्या वतीने आयोजित ४४ वा विवाहयोग्य वधू-वर आणि पालक परिचय मेळावा आज रविवारी रामदासपेठ येथील मराठा मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. अकोल्यातील मराठा सेवा मंडळाने समाजसेवेचा एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे. यावर्षीचा परिचय मेळावा हा ४४ व्या वर्षात पदार्पण करत असून, यासाठी केवळ महाराष्ट्रच नव्हे तर मध्य प्रदेश, गुजरात आणि इतर राज्यांतूनही समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी आणि 'दास मोबाईल'चे संचालक रितेश मिर्झापुरे यांनी आपल्या भाषणात मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले की, 'मराठा सेवा मंडळाने सलग ४४ वर्षे हा उपक्रम राबवून समाजासमोर एक उत्तम उदाहरण ठेवले आहे. लवकरच मंडळाचे सुसज्ज मंगल कार्यालय पूर्णत्वास येत आहे, ही समाजासाठी अभिमानाची बाब



आहे.' कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने व माल्यार्पणाने झाली. यावेळी व्यासपीठावर मराठा सेवा मंडळाचे अध्यक्ष मुरलीदादा सटाले, प्रशांत जानोरकर, कैलास गाढवे, पंडित चौधरी सर, सचिव गणेश गिराम, प्रदीप लुगडे, मारोतीराव भगत, चंद्रकांत पन्हालकर, श्रीकृष्ण जाधव, संजय केंदळे, आशिष जाधव, सुनील चौहान, अनिल मोटे, प्रवीण शिंदे, संभाजी खेडकर उपस्थित होते.तसेच महिला कार्यकारिणीच्या सौ. माधुरी बिडवे, दुर्गा पवार, शोभा चौधरी, शारदा सटाले, मंगला यादव, प्रिया चौहान, मनीषा शिंदे, शीतल चौहान, स्वाती खेडकर, इंदिरा आवटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 'सोयरिक' या वधू-वर परिचय पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. या मेळाव्यात शेकडो विवाहयोग्य तरुण-तरुणींनी स्टेजवर येऊन आपला परिचय दिला. परिचय देणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मंडळाच्या वतीने भेटवस्तू देऊन त्यांचा उत्साह वाढवण्यात आला. अलोट गर्दीमुळे मराठा मंगल कार्यालयाचा परिसर समाजबांधवांनी फुलून गेला होता. संचालन अनिल बिडवे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश गिराम यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल अध्यक्ष मुरलीदादा सटाले यांनी माहिती दिली.

# अरविंद शिंगाडे यांची राज्यस्तरासाठी निवड

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**खामगाव :** जिल्हा परिषद हायस्कूल ( मुली ) खामगाव येथील पदवीधर शिक्षक व समुपदेशक यांची व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन स्पर्धेत राज्यस्तरासाठी निवड झाली आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे वतीने सध्या राज्यभरातील शिक्षक व अधिकारी यांच्यासाठी विविध ४३ प्रकारच्या स्पर्धा सुरू आहेत. 'व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन ' या स्पर्धे अंतर्गत 'आंतरविद्याशाखीय शिक्षणातील करिअरच्या विविध संधी ' या विषयावरील प्रभावी व नावीन्यपूर्ण सादरीकरणामुळे त्यांना अमरावती विभागात प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. अकोला येथे अलीकडेच विभाग स्तरीय स्पर्धा पार पडल्या. त्यामध्ये विभागातून पाचही जिल्ह्यातील अनेक स्पर्धकांनी व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन या विषयातील सादरीकरणांमध्ये भाग घेतला. अरविंद शिंगाडे यांनी विभागस्तरीय स्पर्धेमध्ये सर्वोत्तम सादरीकरण करून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यांची मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे.अरविंद शिंगाडे यांच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# वन्यप्राण्यांच्या हैदोसाने पिकांचे नुकसान, शेतकरी चिंताग्रस्त

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोला :** गावागावांतील शेतशिवारात वन्यप्राण्यांचा हैदोस वाढल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. रानडुक्कर, हरणे, माकडे तसेच काही भागांत बिबट्यांच्या हालचालींमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून, मेहनतीचा घास क्षणात मातीमोल होत आहे. विशेषतः तूर, कपाशी, हरभरा, भाजीपाला व फळबागा या पिकांना सर्वाधिक फटका बसत आहे.

रात्रीच्या वेळी कळपाने येणारी रानडुकरे उभ्या पिकांची नासधूस करतात. माकडांच्या टोळ्या दिवसा शेतात शिरून फळे तोडून टाकतात, तर हरणे पिके चरत असल्याने उत्पादनात मोठी घट होत आहे. अनेक शेतकरी रात्ररात्र शेतात पहारा देत आहेत. मात्र, वन्यप्राण्यांच्या संख्येत झालेली वाढ आणि अपुरी

पिकांच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. बियाणे, खत, औषधे व मजुरीचा खर्च वसूल होणे कठीण झाले असून, कर्जबाजारीपणाचा धोका वाढला आहे.

वनविभागाने पिंजरे लावणे, गस्ती वाढवणे व सौर कुंपण उभारणीस प्रोत्साहन देणे अशा उपाययोजना जाहीर केल्या आहेत. मात्र, शेतकऱ्यांच्या मते या उपायांची अंमलबजावणी अपुरी आहे. वन्यप्राणी आणि मानवी वस्तीतील संघर्ष कमी करण्यासाठी तातडीने प्रभावी उपाय, वेळेत नुकसानभरपाई आणि दीर्घकालीन व्यवस्थापन आराखडा राबविण्याची जोरदार मागणी होत आहे. वन्यप्राण्यांचा हैदोस थांबवण्यासाठी प्रशासन, वनविभाग आणि शेतकरी यांच्यात समन्वय साधत ठोस पावले उचलली नाहीत, तर शेती व्यवसायावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शेतकरी नुकसान भरपाईची मागणी करीत आहेत.

# नाईक होमिओपॅथी येथे अनेक असाध्य आजारावर उपचार केले जातात

## ◆ गेली ४० वर्षे सर्व आजारांवर यशस्वी उपचार केल्याचा दावा

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोला :** येथील नाईक होमिओपॅथी मध्ये थॉयरॉईड , लठ्ठपणा, अॅसीडीटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधीवात, मायग्रेन, पिसीओडी सारख्या असाध्य आजारावर उपचार करून रूग्णांना पुन्हा जीवन प्रवाहात आणण्याचे कौशल्य आहे. अॅडव्हॉन्सड् होमिओपॅथीच्या उपचाराने आजमितीस हजारो रूग्णांनी त्याचा लाभ घेतलेला आहे. गेल्या ४० वर्षापासून नाईक होमिओपॅथी येथे शरीराच्या सर्व आजारावर सर्वांगीण यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रूग्णांना कुठेही फायदा झाला नाही. अश्या रूग्णांनी एकदा अवश्य भेट द्यावी

अधिक माहिती मोबाईल क्र.




९१७५९५७१२९, १३००१६१२९ व वर माहिती घ्यावी.

माझे नांव भालचंद, नाईक होमिओपॅथी येथे येण्यापुर्वी माझे दोन्ही पाय खुप दुखायचे. गुडघे दुखायचे, पोट साफ होत नव्हते, खुप चिडचिड व्हायची, टेंशन आले होते. आता एका महिन्याच्या उपचारानंतर अॅडव्हॉन्सड् होमिओपॅथी औषधांमुळे मला चांगला आराम आहे. माझे सर्व त्रास खुप कमी झाले आहेत. एक महिन्याच्या उपचारानंतर मी ४० टक्के समाधानी आहे असे सांगितले.

# तालुक्यात शेतकऱ्यांना हाय ओलेइक भुईमूगाचे मोफत बियाणे

प्रतिनिधी २२ डिसेंबर

**अकोट :** अकोट तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची आणि लाभदायक संधी उपलब्ध झाली असून, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियान–तेलबिया अंतर्गत उन्हाळी हंगाम २०२५ साठी हाय ओलेइक भुईमूग वाणाचे प्रमाणित बियाणे १०० टक्के अनुदानावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हे बियाणे शेतकऱ्यांना शेंगांच्या स्वरूपात वितरित करण्यात येणार असून, लवकरच प्रत्यक्ष वितरणास सुरुवात होणार आहे.



या योजनेची अंमलबजावणी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर करण्यात येणार आहे. शिवपूर येथील शेतकरी सतिश अशोक बोंद्रे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अकोट तालुक्यात या योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रियेला गती मिळाली आहे. सदर हाय ओलेइक भुईमूग वाण जुनागढ व यांच्या सहकार्याने भारतात प्रथमच विकसित करण्यात आले आहेत. या वाणांमध्ये ओलेइक आम्लाचे प्रमाण अधिक व लिनोलेइक आम्लाचे प्रमाण कमी असल्यामुळे भुईमूग तेलाची टिकाऊपणा लक्षणीयरीत्या वाढतो. परिणामी अन्नप्रक्रिया उद्योगात स्टॅबिलायझरचा वापर कमी होऊन दर्जेदार व निर्यातक्षम उत्पादन शक्य होते. ही योजना गट व क्लस्टर पद्धतीने राबविण्यात येणार आहे. ३१मार्च २०२४ पूर्वी स्थापन झालेले नोंदणीकृत शेतकरी गट या योजनेसाठी पात्र असतील. प्रत्येक १० हेक्टर क्षेत्रासाठी एक शेतकरी गट तयार करण्यात येणार असून, एका गटात कमाल २५ शेतकरी सहभागी असतील. योजनेनुसार प्रत्येक शेतकऱ्याला जास्तीत जास्त १ एकर क्षेत्रासाठीच भुईमूग बियाण्याचा लाभ मिळणार आहे. योजना नोंदणीकृत शेतकरी गटांसाठी असून, महाडीबीटी पोर्टलवर गटाच्या नावाने ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. लॉगिन करताना तांत्रिक अडचण येत असल्यास संबंधित कृषी कार्यालयात ऑफलाईन अर्ज सादर करता येईल.

> ◆'हाय ओलेइक भुईमूग वाणाचे मोफत बियाणे १०० टक्के अनुदानावर शेंगांच्या स्वरूपात उपलब्ध करून देणे हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय आहे. या वाणामुळे उत्पादनाचा दर्जा, साठवणूक क्षमता आणि बाजारपेठेतील टिकाऊपणा वाढणार असून शेतकऱ्यांना अधिक दर मिळण्याची संधी निर्माण होईल.'.
>
> **– सतिश बोंद्रे,** शिवपूर


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK